196093

UNIVERSAL LIBRARY
OU_196093
UNIVERSAL LIBRARY

# आपलें बोलणें

## पुस्तक ४ थें

[ मराठी सातवी आणि इंग्रजी ३री व ४थी ह्यांकरितां ]

( आवृत्ति पहिली )

लेखक—मोरेश्वर सखाराम मोने
( अध्यापक, 'अध्यापिकाशाला,' हिंगणें, पुणें )

मॅक्मिलन् आणि कंपनी, लिमिटेड,
हॉर्नबी रोड, कोट, मुंबई

सर्व हक्क स्वाधीन ] १९३० [ किंमत ६ आणे

Printed by V. P. Pendherkar, at the Tutorial Press,
211a, Girgaon Back Road, Bombay
and
Published by F. E. Francis, for Messrs. Macmillan & Co., Ltd.,
Fort, Bombay

# प्रस्तावना

"**आपलें बोलणें**" ह्या नांवाच्या व्याकरण-पुस्तकांपैकीं चौथें पुस्तक अजूनपर्यंत माझ्या हातून बाहेर पडलें नव्हतें, तें आतां बाहेर पडून संकल्पित काम शेवटास गेल्याबद्दल मला आनन्द होत आहे. 'अध्यापिका-शाले'त शिकवीत असतां विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें जशीं व्याकरण-पुस्तकें हवींत, अशी माझी फार दिवसांची कल्पना होती, तीप्रमाणें हीं पुस्तकें मीं लिहून काढिलीं. प्रो० **लागू** यांनीं मला ह्या कामीं फारच प्रोत्साहन दिलें. प्रो० **पोतदार** ह्यांच्या सहकारित्वानें प्रथम हीं पुस्तकें बाहेर पडावयाचीं होतीं, परन्तु त्यांच्या कार्यपसाऱ्यामुळें तें कांहीं जमलें नाहीं. त्यांतच सरकारनें व्याकरणाचा कोर्स ठरविण्यासाठीं एक कमिटी नेमिली, त्यामुळें बराच काळ गेला. तथापि कमिटीच्या कामाचें व कोर्सचें स्वरूप पुष्कळांशीं माझ्या मतांना पोषकच बाहेर पडेल असें वाटूं लागल्यामुळें, मीं माझ्या ह्या पुस्तकांची प्रथमावृत्ति सर्वांचे अगोदर प्रसिद्ध केली. आज माझ्या त्या पुस्तकांतील व नवीन आवृत्तीच्या पुस्तकांतीलच अनेक गोष्टींचें अनुकरण बेधडक होऊं लागलें आहे, ही गोष्ट लपण्यासारखी नसून, चाणाक्ष तज्ज्ञांच्या ती ध्यानांत आल्यावांचून राहिलीच नसेल. असो.

या आवृत्तीचे वेळीं शिक्षणशास्त्र व व्याकरणशास्त्र यांची अधिक गोड संगति जुळवून देण्याचें साह्य प्रि० **कारखानीस** व माझे मित्र रा० **गोविन्दराव मोकाशी** यांनीं केलें आहे, हें मीं पूर्वीच सांगून टाकिलें आहे. ह्या माझ्या शेवटच्या पुस्तकांत कांहीं प्रमुख व्याकरणकारांचे फोटो व त्यांचीं अगदीं त्रोटक चरित्रें, व्याकरणाच्या प्रगतीचा थोडक्यांत इतिहास, इ० कांहीं गोष्टी माझ्या पुस्तकाच्या वैशिष्ट्यासाठीं द्यावयाचें मनांत होतें; पण सध्यांच्या जीवनकलहांत कोर्सपलीकडे जाणें इष्ट नसल्यामुळें, तें सर्व मनांत दाबून ठेवणें भाग पडलें.

या पुस्तकांतील वृत्तें व अलंकार यांचा भाग प्रो० **वामन मल्हार जोशी** यांच्या नजरेखालीं घालून, मगच छापला आहे.

"अध्यापिकाशाला"
हिंगणें, पुणें.

आपला नम्र,
**मोरेश्वर सखाराम मोने**

…ED 1956

Checked 1965

# अनुक्रमणिका


| १ | पृष्ठ |
|---|---|
| १. मिश्रवाक्य .... | १ |
| २. मिश्रवाक्य-पृथक्करण | ६ |
| ३. निरनिराळ्या प्रकारचीं मिश्र-संयुक्त वाक्यें.... | ९ |
| ४. अर्थदृष्ट्या वाक्यांचे प्रकार .... | १४ |
| ५. वर्णांचे भेद .... | १६ |
| ६. व्यंजन-संधि .... | २० |
| ७. समास—१ .... | २४ |
| ८. समास—२ .... | २९ |
| ९. पद्यविशेष—१ .... | ३५ |
| १०. पद्यविशेष—२ .... | ४१ |

| २ | पृष्ठ |
|---|---|
| ११. उपसर्ग व प्रत्यय .... | ४७ |
| १२. प्रत्ययघटित संस्कृत शब्द—१ .... | ५० |
| १३. प्रत्ययघटित संस्कृत शब्द—२ .... | ५४ |
| १४. मराठी साधित शब्द-१ | ५७ |
| १५. मराठी साधित शब्द-२ | ६२ |
| १६. परभाषेंतील शब्द | ६५ |

| ३ | |
|---|---|
| १७. प्रास्ताविक .... | ७१ |
| १८. मराठी वृत्तें .... | ७६ |
| १९. संस्कृतांतून आलेलीं वृत्तें | ८१ |

| ४ | |
|---|---|
| २०. भाषाभूषणें .... | ८७ |
| २१. कांहीं शब्दालंकार.... | ९१ |
| २२. प्रमुख अर्थालंकार.... | ९५ |

# आपलें बोलणें

## पुस्तक चौथें

[ सातव्या इयत्तेकरितां ]

१

## १. मिश्रवाक्य

[ १ ]

( १ ) वाक्यांत जेव्हां एकच क्रियापद असतें, तेव्हां तें " **शुद्ध-वाक्य** " असतें; ( २ ) जेव्हां आणि, व, अथवा, किंवा, ह्या शब्दांनीं दोन वाक्यें जोडिलीं जातात, तेव्हां तें सर्व मिळून " **संयुक्त-वाक्य** " होतें; आणि ( ३ ) जेव्हां जो–जी–जें हीं सर्वनामें, जेव्हां–जेथपासून–जेथपर्यंत इ० क्रियाविशेषणें, जसा–जेवढा–जितका–हा–असा इ० विशेषणें, कारण–म्हणून–कीं इ० उभयान्वयी अव्ययें, अशा, विशेषत: संबंधी किंवा इतर कांहीं शब्दांनीं आरंभ असलेल्या,

वाक्यांवर दुसरें वाक्य अवलंबून असतें, तेव्हां तें पोटवाक्य व मुख्य वाक्य हें सर्व मिळून “ **मिश्र-वाक्य** ” होतें; हें आपल्यास पूर्वीच माहीत झालें आहे.

आतां आपण मिश्र-वाक्यांत जीं पोटवाक्यें असतात, तीं काय काम करितात, तें पाहूं.

१. तुझें **बोलणें** बरोबर नाहीं.

२. “ तूं बोललास,” हें बरोबर नाहीं.

ह्यांपैकीं पहिल्या वाक्यांत **बोलणें** हा शब्द नाम आहे, व तो ‘ नाहीं ’ ह्या क्रियापदाचा कर्ता आहे; दुसऱ्या वाक्यांत **बोलणें** ह्या नामाऐवजीं “ तूं बोललास ” एवढें पोटवाक्य आलें आहे; यावरून असें दिसतें कीं, मुख्य वाक्यांतील नामाच्याबद्दल किंवा कर्त्याच्याबद्दल हें पोटवाक्य आलें आहे.

१. माझें मुंबईस **जाणें** तुझ्या पथ्यावर पडलें.

२. “ मी मुंबईस गेलों,” हें तुझ्या पथ्यावर पडलें.

ह्या ठिकाणींही वरच्याप्रमाणेंच **जाणें** ह्या नामाबद्दल किंवा कर्त्याबद्दल “ मी मुंबईस गेलों ” हें सबंध वाक्य आलें आहे, हें उघडच आहे.

ह्याचप्रमाणें खालील उदाहरणें पहा—

१. ठाकुरानें ही **गोष्ट** आपल्या जावयास सांगितली.

२. “ इसरिसिंग दगा करणार आहे, ”
असें ठाकुरानें आपल्या जावयास सांगितलें.

ह्यांपैकीं पहिल्या वाक्यांत **गोष्ट** हा शब्द नाम आहे, व तो ‘सांगितली’ ह्या क्रियापदाचें कर्मही आहे; त्याबद्दल दुसऱ्या वाक्यांत “इसरिसिंग दगा करणार आहे” हें पोटवाक्य आलें आहे.

१. गोपींनीं यशोदेस कृष्णाचीं **कृत्यें** सांगितलीं.

२. गोपींनीं सांगितलें कीं, “कृष्ण रोज रोज आमच्या घरचें दहीं-दूध लांबवितो.”

ह्यांतीलही पहिल्या वाक्यांत **कृत्यें** हा शब्द नाम आहे व तो ‘सांगितलीं’ ह्या क्रियापदाचें कर्म आहे; त्याबद्दल दुसऱ्या वाक्यांत “कृष्ण रोज रोज आमच्या घरचें दहीं-दूध लांबवितो” असें पोटवाक्य आलें आहे.

यावरून असें दिसतें कीं, वाक्यांत कर्ता, कर्म, इ० ज्या ज्या ठिकाणीं **नाम** येतें, त्या त्या ठिकाणीं त्या नामाबद्दल पोटवाक्यही येऊं शकतें. म्हणून मिश्र-वाक्यांतील अशा पोटवाक्यास “**नाम-वाक्य**” असें म्हणण्यास काय हरकत आहे?

[२]

१. **सिंह** मृत पशूच्या कणाची इच्छा करीत नाहीं.

२. “जो उन्मत्त हत्तींचीं गंडस्थळें फोडितो,” तो सिंह मृत पशूच्या कणाची इच्छा करीत नाहीं.

येथें पहिल्या वाक्यांत **सिंह** हें नाम आहे, व तो ‘करीत नाहीं’ ह्या क्रियापदाचा कर्ताही आहे. ह्या नामाचा **गुण** दाखविण्यासाठीं

म्हणजे सिंह कोणता हें सांगण्यासाठीं "जो उन्मत्त हत्तींचीं गंडस्थळें फोडितो" हें पोटवाक्य आलें आहे.

त्याचप्रमाणें—

१. भीमानें **जरासंधाला** मारिलें.

२. "ज्यानें अनेक राजांना बंदींत टाकिलें होतें,"
त्या जरासंधाला भीमानें मारिलें.

ह्यांतील पहिल्या वाक्यांत **जरासंधाला** हा शब्द नाम आहे, व तो 'मारिलें' ह्या क्रियापदाचें कर्महीं आहे. त्याचा गुण दाखविण्यासाठीं म्हणजे जरासंध **कोणता** किंवा **कसा** हें सांगण्यासाठीं "ज्यानें अनेक राजांना बंदींत टाकिलें" हें पोटवाक्य आलें आहे.

यावरून असें दिसतें कीं, वाक्यांत कर्ता, कर्म, इ० ज्या ज्या ठिकाणीं **नाम** येतें, त्या त्या नामांचा **गुण** दाखविणारीं पोटवाक्येंही मिश्र-वाक्यांत येतात; ह्या नामांचा **गुण** दाखविणाऱ्या पोटवाक्यांना "**विशेषण-वाक्य**" असें म्हणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं.

[ ३ ]

१. "तो जेव्हां आला,"
**तेव्हां** मी स्नान करीत होतों.

२. "जिकडे योगीश्वर कृष्ण आहे,"
**तिकडे** जय आहे.

३. "जसें माझ्या मनास वाटेल," **तसें** मी करीन.

४. "जोंपर्यंत सद्दी आहे," **तोंपर्यंतच** पापें पचतात.

ह्या सर्व ठिकाणीं पहिलीं वाक्यें क्रिया **केव्हां** झाली, **कोठें** झाली, **कशी** झाली, इ० **क्रियेचा गुण** दर्शविणारीं आहेत, हें उघड आहे.

यावरून असें दिसतें कीं, वाक्यांत **क्रियेचा गुण** दाखविणारे जसे क्रियाविशेषण-शब्द येतात, त्याचप्रमाणें मुख्य वाक्यांतील क्रियेचा गुण दाखविणारीं पोटवाक्येंही मिश्रवाक्यांत येतात. ह्यांना—तीं क्रियेचा गुण दाखविणारीं वाक्यें असल्यामुळें—आपण "**क्रिया-विशेषण-वाक्यें**" असें म्हणूं.

आज आपण कोणता विचार केला ?

**१. मिश्रवाक्यांत तीन प्रकारचीं पोटवाक्यें येऊं शकतात.**

**२. नामवाक्य, विशेषणवाक्य व क्रियाविशेषण-वाक्य.**

---

## प्रश्न व गृहपाठ

१. **नामवाक्यें** व **विशेषणवाक्यें** हीं कशीं ओळखाल ?

२. **क्रियाविशेषण-वाक्यें** कशीं ओळखाल ?

३. खालील वाक्यांतील **नामवाक्यें, विशेषणवाक्यें** व **क्रियाविशेषण-वाक्यें** ओळखून सांगा—

(१) मनोदेवतेच्या प्रेरणेवरून ज्या आज्ञा आपणांस कळून येतात, त्यांस अनुसरून आपण वागलें पाहिजे. (२) जोंपर्यंत जिवांत जीव आहे, तोंपर्यंत मी तुला अंतर देणार नाहीं. (३) ईश्वराची लीला किती अगाध आहे, हें सांगतां येणार नाहीं. (४) जेव्हां कलकत्ता ही राजधानी सोयस्कर वाटेनाशी झाली, तेव्हां सरकारनें ती बदलून पुनः दिल्ली ही राजधानी केली. (५) वारंवार खोटें बोलतोस, हें बरोबर नाहीं. (६) गोविंदराव म्हणाले कीं, 'तुमच्याकडे येण्यास मला आतां वेळ नाहीं'. (७) जिकडे जावें, तिकडे

हीच रड ! ( ८ ) 'आजचा दिवस तसाच आहे', असें जवानसिंगानें म्हटलें. ( ९ ) जसे पुढारी वागतात, तसे लोक वागतात.

४. **कर्त्यांबद्दल** आलेलीं दोन व **कर्मांबद्दल** आलेलीं दोन वाक्यें तुम्ही योजून, लिहून आणा.

---

# २. मिश्रवाक्य-पृथक्करण

मागील पाठांतल्याप्रमाणें मिश्रवाक्यांत **नामवाक्यें, विशेषण-वाक्यें** व **क्रियाविशेषणवाक्यें** हीं पोटवाक्यें किंवा गौणवाक्यें येतात; असें झालें. एकंदर मिश्रवाक्याचें पृथक्करण शुद्ध वाक्याच्या पृथक्करणाप्रमाणेंच असणार, हें उघड आहे; तथापि त्याची पद्धति व खुलासा स्पष्ट ध्यानांत येण्यासाठीं आपण एक-दोन वाक्यांचें पृथक्करण लिहून पाहूं. प्रथम वाक्य, नंतर त्या वाक्याचें स्वरूप म्हणजे स्पष्टीकरण, आणि नंतर पृथक्करण, ही योजना आपल्या अधिक उपयोगी पडेल. तसेंच " **वाक्यपृथक्करण** " म्हटलें म्हणजे शुद्ध, संयुक्त किंवा मिश्र, कोणत्याही प्रकारच्या वाक्याचें पृथक्करण त्यांत स्पष्ट झालें पाहिजे; म्हणून मुख्य वाक्याचें स्पष्टीकरण प्रथम व गौण-वाक्यांचें क्रमानें त्यामागून, असें पृथक्करण करणें व लिहिणें सोयीचें होईल.

१. **वाक्य**—" ( १ ) तो श्रीमंताचा मुलगा असावा, ( २ ) असें त्याच्या पोशाखावरून व बोलण्याच्या ऐटीवरून दिसतें."

**स्पष्टीकरण**—हें मिश्रवाक्य असून, यांतील दुसरें मुख्य वाक्य आहे व पहिलें त्याचें गौण नामवाक्य आहे. याचें पृथक्करण खालीलप्रमाणें—

| वाक्यें | १ | | २ | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | उद्देश्यविस्तार | उद्देश्य | कर्मविस्तार | कर्म | विधेयविस्तार | विधेय |
| (२) | ... | असें | ... | ... | त्याच्या पोशाखा-वरून, व बोलण्या-च्या ऐटीवरून, | दिसतें. |
| (१) | ... | तो | ... | ... | श्रीमंताचा मुलगा | असावा |

**२. वाक्य**—"(१) अशा रीतीनें वृद्धापकाळीं स्वस्थपणानें सुखाचे दिवस घालवावे, (२) म्हणून गोविंदराव टेकाडे यांनीं सहा महिन्यांची रजा घेतली."

**स्पष्टीकरण**—हें मिश्रवाक्य असून, यांतीलही दुसरें वाक्य मुख्य आहे व पहिलें त्याचें गौण क्रियाविशेषणवाक्य आहे. याचें स्पष्टीकरण खालीलप्रमाणें—

| वाक्यें | १ | | २ | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | उद्देश्यविस्तार | उद्देश्य | कर्मविस्तार | कर्म | विधेयविस्तार | विधेय |
| (२) | गोविंदराव टेकाडे | यांनीं | सहा महिन्यांची | रजा | म्हणून, | घेतली. |
| (१) | ... | आपण | सुखाचे | दिवस | अशा रीतीनें, वृद्धा-पकाळीं, स्वस्थपणानें | घालवावे |

**३. वाक्य**—" (१) जो ब्रह्मदेशाचीं सूत्रें आपल्या मुखत्यारीनें हालवीत असे, (२) तो थिबा राजा ह्याच राजवाड्यांत नजरकैदेंत होता."

**स्पष्टीकरण**—हें मिश्रवाक्य असून, यांतील दुसरें वाक्य प्रमुख आहे; व पहिलें त्याचें गौण विशेषणवाक्य आहे. याचें स्पष्टीकरण खालीलप्रमाणें—

| वाक्यें | १ | | २ | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | उद्देश्यविस्तार | उद्देश्य | कर्म-विस्तार | कर्म | विधेयविस्तार | विधेय |
| (२) | तो | थिबा-राजा | ... | ... | ह्याच राजवाड्यांत, नजरकैदेंत, | होता. |
| (१) | ... | जो | ब्रह्म-देशाचीं | सूत्रें | आपल्या मुखत्यारीनें | हालवीत असे, |

## प्रश्न व गृहपाठ

१. खालील मिश्रवाक्यांचें पृथक्करण तोंडी सांगा किंवा त्यांपैकीं रोज एकेकाचें पृथक्करण घरून नीट लिहून आणाः—

(१) आंधळ्यांचीं जीं इंद्रियें शाबूत असतात, त्यांनीं त्यांचें बहुतेक सर्व काम भागतें. (२) आपण शरीरानें बळकट व्हावें, असें सर्वांस वाटतें. (३) आपण सर्व उपजतच हुशार किंवा शरीरानें सुदृढ नसलों, तरी आपली शरीरशक्ति व निश्चयशक्ति वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न आपणा सर्वांस करितां येईल. (४) प्रथम शरीर सुदृढ ठेवावयास काय केलें पाहिजे, तें पाहूं. (५) मुलांनीं पक्कें ध्यानांत ठेवावें कीं, वयानें मोठ्या अशा मनुष्यांच्या

दुर्गुणांचें अनुकरण केल्यानें अंगीं मर्दपणा येत नाहीं. (६) मुलांनो, गणपतरावाच्या घरास आग लागली असतां, कृष्णरावानें सावधगिरी ठेवून, त्याच्या घराचा व माणसांचा बचाव कसा केला, तें तुम्हीं चौथ्या पुस्तकांत वाचिलेंच आहे. (७) एका खेडेगांवांत एकदां कांहीं माणसें रात्रीं अंगणांत बोलत बसलीं होतीं, इतक्यांत एक सनाट्या वाघ जवळच्या झाडींतून निघून त्यांच्याजवळ येऊन ठेपला. (८) अंगावर वाऱ्याची झुळूक न येईल, अशा ठिकाणीं निजावें. (९) जोंपर्यंत कर्तव्यदक्ष अशा पुरुषांची परंपरा देशांत सारखी उत्पन्न होत राहते, तोंपर्यंत त्या देशाची भरभराट कायम टिकते. (१०) सियाम देशांतील कंबोज प्रांतांत डच लोक येईपर्यंत तेथें हिंदुधर्म चालू होता, असे लेख आहेत.

२. वरील मिश्रवाक्यांपैकीं **नामवाक्यें**, **विशेषणवाक्यें** व **क्रियाविशेषण-वाक्यें** कोणतीं तीं सांगा.

३. **मिश्रवाक्य** कसें ओळखावें? त्यांत मुख्य वाक्य व गौणवाक्य केव्हां येतें, ह्याबद्दल कांहीं नियम आहे काय?

४. गौणवाक्य आरंभीं असलेलीं तीन उदाहरणें व मुख्य वाक्य प्रथम असलेलीं तीन उदाहरणें घरून लिहून आणा.

---

# ३. निरनिराळ्या प्रकारचीं मिश्र-संयुक्त वाक्यें.

[ १ ]

१. समुद्र व महासागर हे व्यापाराचे मार्ग होत.

२. त्यांस दुरुस्त ठेवावयास खर्च लागत नाहीं.

३. लोक त्यांतून जहाजांच्या साह्यानें प्रवास करितात.

ह्या सर्व वाक्यांतून एकेकच क्रियापद आहे, म्हणून हीं सर्व **शुद्धवाक्यें** आहेत.

आतां खालील वाक्यें पहा—

| | |
|---|---|
| १. (अ) जिची मला उत्कंठा होती,<br>ती काशीपुरी मीं आज पाहिली. | हें एक गौणवाक्य असलेलें **मिश्रवाक्य.** |
| २. (अ) जी हिंदु धर्माचें पवित्र क्षेत्र मानितात,<br>(आ) जेथें देह ठेवण्यास लोक जातात,<br>ती काशीपुरी मीं आज पाहिली. | हें दोन गौणवाक्यें असलेलें **मिश्रवाक्य.** |
| ३. (अ) जेथें आंबे, पोफळी, विपुल होतात,<br>(आ) जेथील पाण्यांत त्या वृक्षांच्या छाया झोंके घेतात,<br>(इ) ज्यांत मासे विजांप्रमाणें चमकतात,<br>त्या खाड्या मी केव्हां पाहीन ? | हें तीन गौणवाक्यें असलेलें **मिश्रवाक्य.** |

[ २ ]

आतां— १. वारा आला व पाऊस गेला.

२. कागद आण आणि पाटी-पेन्सिलही आण.

हीं **संयुक्त-वाक्यें** आहेत, हें आपल्यास माहीतच आहे. त्याचप्रमाणें संयुक्त-वाक्यें नेहमीं दोनच प्रमुख वाक्यांमिळून होतात, असें नाहीं; हेंही आपल्यास माहीत आहे. परंतु आपल्या बोलण्यांत नेहमीं नुसतींच शुद्ध-वाक्यें, संयुक्त-वाक्यें किंवा मिश्र-वाक्यें येतात काय ?

आपण खालील वाक्यें कशा प्रकारचीं आहेत, त्यांचा विचार करूं.

[क] १. लहान मुलें नेहमीं अनेक प्रकारचे प्रश्न विचारितात; आणि मोठ्या मनुष्यांना भंडावून सोडितात. [ दोन प्रमुख वाक्यांचें **संयुक्त-वाक्य.** ]

२. लहान मुलें नेहमीं ( १ ) "हें काय आहे," असे प्रश्न विचारितात; आणि मोठ्या मनुष्यांना भंडावून सोडितात. [ पहिल्या प्रमुख वाक्याच्या पोटांत १ गौणवाक्य असलेलें **संयुक्त-वाक्य.** ]

३. लहान मुलें नेहमीं ( १ ) "हें काय आहे, ( २ ) तें काय आहे," असे अनेक प्रकारचे प्रश्न विचारितात; आणि मोठ्या मनुष्यांना भंडावून सोडितात. [ पहिल्या प्रमुख वाक्याच्या पोटांत २ गौणवाक्यें असलेलें **संयुक्त-वाक्य.** ]

४. लहान मुलें नेहमीं "( १ ) हें काय आहे, ( २ ) तें काय आहे, ( ३ ) याचा उपयोग काय, ( ४ ) त्याचा उपयोग काय," असे अनेक प्रकारचे प्रश्न विचारितात; आणि मोठ्या मनुष्यांना भंडावून सोडितात. [ पहिल्या प्रमुख वाक्याच्या पोटांत ४ गौणवाक्यें असलेलें **संयुक्त-वाक्य.** ]

[ख] १. लहान मुलांची जिज्ञासा फार तीव्र असते; आणि तीं (१) "हें काय आहे," असे वारंवार प्रश्न विचारितात. [ हें २ ऱ्या प्रमुख वाक्यांत १ गौणवाक्य असलेलें **संयुक्त-वाक्य.** ]

२. लहान मुलांची जिज्ञासा फार तीव्र असते; आणि तीं (१) "हें काय आहे, ( २ ) तें काय आहे, ( ३ ) याचें नांव काय, ( ४ ) त्याचें नांव काय, ( ५ ) याचा उपयोग काय, ( ६ ) तें कशाला पाहिजे," असे अनेक प्रश्न विचारितात. [ दुसऱ्या प्रमुख वाक्यांत ६ गौण-वाक्यें असलेलें **संयुक्त-वाक्य.** ]

[ग] १. (१) "जेव्हां मुलें लहान असतात", तेव्हां त्यांची जिज्ञासा तीव्र असते; आणि तीं (१) "हें काय आहे", असें विचारून मोठ्या माणसांस भंडावून सोडितात. [दोन्ही प्रमुख वाक्यांत एक एक गौणवाक्य असलेलें **संयुक्त-वाक्य.** ]

२. (१) "जेथें माझा जन्म झाला, (२) जेथें मी खेळलों", ती जन्मभूमि मला अत्यन्त प्रिय आहे; आणि (१) "तिच्या उन्नतीसाठींच मीं झटावें, (२) प्रसंगीं प्राणही अर्पावा", हें माझें कर्तव्यच आहे. [दोन्ही प्रमुख वाक्यांत दोन दोन गौणवाक्यें असलेलें **संयुक्त-वाक्य.** ]

३. (१) "मनुष्यें आपल्या मुलांची काळजी घेतात, (२) त्यांचें रक्षण करितात, (३) त्यांना वाढवितात, (४) त्यांच्यासाठीं कष्ट करितात", असें आपण पाहतों; आणि पशुपक्षीही त्यांच्याप्रमाणेंच (१) "आपल्या पिलांची काळजी घेतात, (२) त्यांचें रक्षण करितात, (३) त्यांना वाढवितात, (४) त्यांच्या सुखार्थ झटतात", हें आपल्या नेहमीं आढळण्यांत येतें. [दोन्ही प्रमुख वाक्यांत चार चार गौणवाक्यें असलेलें **संयुक्त-वाक्य.** ]

याप्रमाणेंही अनेक पोटवाक्यांसहित एक मिश्रवाक्य एकीकडे व त्याचसारखें अनेक पोटवाक्यांसहित दुसरें मिश्रवाक्य एकीकडे; यांची मधल्या उभयान्वयी अव्ययानें सांगड जुळून, एक मोठें **संयुक्त-वाक्य** होतें.

वाक्य केवढेंही असो, अगोदर मुख्य वाक्याचें व मागून क्रमानें त्यांतील पोटवाक्यांचें स्पष्टीकरण मागील पद्धतीप्रमाणेंच केलें, म्हणजे झालें. आपण अशा एका वाक्याचें येथें स्पष्टीकरण करूं

**वाक्य**—"( १ ) ज्याची स्पर्धा कराया इतर गज कधीं शक्त नाहींच झाले, ( २ ) ज्याच्या भयें मृगपतिही रान सोडूनि गेले, ( ३ ) तो गजवर आजि पंकामाजी फसला आहे; आणि ( ४ ) त्याला त्यांतून निघायला युक्ति सांपडत नाहीं, ( ५ ) म्हणून हे क्षुद्र कोल्हे कलकल करून त्याला अव्हेरीत आहेत !"

**स्पष्टीकरण**—हें संयुक्त वाक्य असून, यांत एकंदर पांच वाक्यें आहेत. पैकीं ३ रें आणि ५ वें हीं प्रमुख वाक्यें असून, १ व २ हीं तिसऱ्याचीं गौणवाक्यें आहेत; आणि ४ थें, पांचव्या मुख्य वाक्याचें गौणवाक्य आहे. याचें पृथक्करण खालीलप्रमाणें—

| वाक्यें | १ | | २ | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | उद्देश्य-विस्तार | मूल उद्देश्य | कर्म-विस्तार | कर्म | विधेयविस्तार | मूल विधेय |
| ( ३ ) | तो | गजवर | ... | ... | आजि, पंकामाजी, | फसला आहे. |
| ( १ ) | इतर | गज | ... | ... | कधीं, ज्याची स्पर्धा कराया, शक्त, | नाहींच झाले. |
| ( २ ) | ... | मृगपतिही | ... | ... | ज्याच्या भयें, रान सोडूनि, | गेले. |
| ( ५ ) | हे क्षुद्र | कोल्हे | ... | त्याला | म्हणून, कलकल करून, | अव्हेरीत आहेत. |
| ( ४ ) | ... | युक्ति | ... | ... | त्याला, त्यांतून निघायला, | सांपडत नाहीं. |

क्वचित् अशा प्रकारचीं वाक्यें आल्यास, त्यांचें याप्रमाणें स्पष्टीकरण व पृथक्करण करावें.

# ४. अर्थदृष्ट्या वाक्यांचे प्रकार

शुद्ध, संयुक्त व मिश्र वाक्य ह्यांच्यासंबंधीं आपण मागें विचार केला. आतां निरनिराळ्या **अर्थांच्या** वाक्यांसंबंधीं विचार करूं.

| | |
|---|---|
| [क] १ हा समुद्र आहे | २ हें आकाश नाहीं |
| १ हा फेस आहे | २ ह्या तारका नाहींत |
| १ ही नाव चालत आहे | २ हा कांहीं चंद्र नाहीं |
| १ हें शीड आहे | २ ही चंद्रावरची खूण नाहीं |

वरच्यांपैकीं पहिल्या प्रत्येक वाक्यांत एकादी गोष्ट '**आहे**' असें सांगितलेलें आहे; व दुसऱ्या प्रत्येक वाक्यांत एकादी गोष्ट '**नाहीं**' असें सांगितलें आहे; याप्रमाणें नुसती एकादी गोष्ट "**आहे–नाहीं, होती–नव्हती, असेल–नसेल,**" एवढेंच सांगणारीं आपल्या बोलण्यांत कांहीं वाक्यें आढळतात. 'सांगणें' म्हणजे **विधान** करणें हें आपल्यास माहीतच आहे; त्यावरून अशा वाक्यांना "**विधानार्थक वाक्यें**" असें म्हणतात. (अशा वाक्यां-तील क्रियापदांचा "**स्वार्थ**" असतो, हें आपण पूर्वीं पाहिलेंच आहे.)

| | |
|---|---|
| [ख] १ या अभिमन्यूला हाणा | ४ शस्त्रें घ्या |
| २ त्याला मारा | ५ तोंडें पाहूं नका |
| ३ त्याला खालीं पाडा | ६ याला प्राणसंकटांत लोटा |

या वाक्यावरून आपल्यास **आज्ञा** केलेली स्पष्ट दिसत आहे; म्हणून यांना आपण "**आज्ञार्थक वाक्यें**" असें नांव देऊं. (अशा

वाक्यांतील क्रियापदांचा '**आज्ञार्थ**' असतो, हेंही आपल्यास मागें गेलेलेंच आहे.)

[ग] १ मीं भराभर पास व्हावें
२ मला चांगला रोजगार मिळावा
३ खूप श्रीमंती यावी
४ मीं दिवाण व्हावें
५ मजकडून खेडोपाडीं सार्वत्रिक शिक्षण फैलावलें जावें
६ खेडोपाडीं गोरगरिबांस फुकट औषधें मिळवून देण्याचें श्रेय मलाच लाभावें
७ लोकांकरितांच हा माझा देह झिजावा
८ तो चांगल्या कीर्तीच्या रूपानेंच उरावा

या सर्व वाक्यांवरून स्पष्टपणें **इच्छा** कळत असल्यामुळें ह्या वाक्यांना आपण "**इच्छार्थक वाक्यें**" असें नांव देऊं. (अशा वाक्यांतील क्रियापदांचा **विध्यर्थ** असतो, ह्याचा सुद्धां विचार आपण मागेंच केला आहे.)

[घ] १ तेथें कोण आहे ?
२ तुझ्या हातांत काय आहे ?
३ मी तुझ्याबरोबर येऊं का ?
४ त्यांना रुपये हवेत काय ?
५ आईला आतां कसें वाटतें ?
६ बाबा काय बरें म्हणतील ?

ह्या सर्व वाक्यांवरून **प्रश्न** केलेला कळत आहे; म्हणून अशा वाक्यांना "**प्रश्नार्थक वाक्यें**" असें आपण म्हणूं.

आणखीही कांहीं **अर्थ** उत्पन्न होणारीं वाक्यें आढळतील; पण त्यांचा विचार सध्यां नको. ह्या सर्व प्रकारच्या वाक्यांचें पृथक्करण साध्या वाक्याप्रमाणेंच करावयाचें; त्यांत कांहीं अडचण पडण्यासारखें दिसत नाहीं.

आज आपण कोणता विचार केला ?

**१. ( १ ) विधानार्थक, ( २ ) आज्ञार्थक, ( ३ ) इच्छार्थक व (४) प्रश्नार्थक, अशीं चार प्रकारचीं वाक्यें मुख्यतः आपल्या भाषेंत आढळतात; हें पाहिलें.**

---

### प्रश्न व गृहपाठ

१. ‘ **स्वार्थी** व **आज्ञार्थी** क्रियापद ’ आणि ‘ **स्वार्थी** व **आज्ञार्थी** वाक्य ’ यांत फरक काय ?

२. खालील वाक्यें कोणत्या **अर्थांचीं** आहेत, तें सांगाः--

( १ ) एकदां वॉशिंग्टनला एक कुऱ्हाड मिळाली. ( २ ) तो ती ज्यावर त्यावर हाणीत सुटला. ( ३ ) त्याने बापाच्या एका आवडत्या झाडाची साल ताशिली. ( ४ ) चाकर-माणसांस हें ठाऊक नव्हतें. ( ५ ) साल कोणीं ताशिली ? ( ६ ) असें बापानें सर्वांस विचारिलें. ( ७ ) पण कोणाकडूनही खरी गोष्ट कळेना. ( ८ ) इतक्यांत जॉर्ज तेथें आला. ( ९ ) मुला, खरें सांग. ( १० ) ह्या झाडाची साल तूं तासलीस काय ? ( ११ ) असें बापानें विचारिलें. ( १२ ) मुलगा म्हणाला, ( १३ ) बाबा, माझ्यानें खोटें बोलवत नाहीं. ( १४ ) मींच ह्या झाडाची साल तासली. ( १५ ) ह्या जॉर्जाप्रमाणें सर्वांनीं खरेंच बोलावें.

३. वरील वाक्यांतील एकेकाचें पृथक्करण घरून रोज लिहून आणा.

---

# ५. वर्णांचे भेद

आपल्या बोलण्यांत जे मूळ उच्चार आहेत, त्यांच्यासंबंधाचा म्हणजे वर्णांच्या संबंधाचा आपण थोडासा विचार पूर्वीं केला होता; आतां आणखी विचार करूं.

[ १ ]

एकंदर वर्णांचे स्वतंत्र व परतंत्र मूळ उच्चार ह्या दृष्टीनें (१) **स्वर**, (२) **अनुस्वार** व **विसर्ग** आणि (३) **व्यंजनें**, असे तीन भेद आपणांस मागें आढळले.

## स्वर

एकंदर स्वर १३. ते सर्व स्वतंत्र मूळ उच्चार आहेत. आतां ह्यांच्याही उच्चारांत कांहीं फरक आढळतो कीं काय, तें पाहूं.

| | | | |
|---|---|---|---|
| वीट | विटा | मूल | मुलें |
| खीळ | खिळा | फूल | फुलें |

वरील शब्दांतील पहिल्या अक्षरांचा उच्चार कसा होतो बरें? वीट, खीळ, ह्या शब्दांमधील पहिल्या अक्षरांचा उच्चार विटा, खिळा, ह्या शब्दांमधील पहिल्या अक्षरांच्या उच्चारापेक्षां **लांबट** आहे, हें आपल्या सहज ध्यानांत येतें.

खालील स्वरांच्या उच्चारांतही हाच फरक आढळतो कीं काय, तें त्यांचा उच्चार करून पहा.

अ इ उ ऋ ऌ .... ह्यांच्या उच्चारापेक्षां—

आ ई ऊ ॠ .... हे उच्चार **लांबट** आहेत.

ए ऐ ओ औ .... हेही उच्चार **लांबटच** होतात.

ह्यामुळें ह्यांतील पहिल्या प्रकारच्या उच्चाराच्या स्वरांस "**ऱ्हस्व स्वर**" व दुसऱ्या प्रकारच्या पहिल्याच्या मानानें **लांबट** उच्चाराच्या स्वरांस "**दीर्घ स्वर**" असें म्हणतात.

सर्व वर्ण आपल्या तोंडांतून बाहेर पडतात, ते तोंडांतल्या कोणत्या ठिकाणापासून बाहेर पडतात; व त्यांतही पुनः कोणत्या वर्णांचे उच्चार **कर्णमधुर** होतात; व कोणत्या वर्णांचे त्यांतल्या त्यांत कानांला **कर्कश** लागतात; ह्याचाही विचार करणें अवश्य आहे.

कारण, आपल्या बोलण्यांत दोन वर्ण एकमेकांत मिळालेले फार वेळां आढळून येतात; व त्यांच्या एकमेकांत मिळण्यामध्यें म्हणजे "**संधि**" होण्यामध्यें कांहीं ठराविकपणा असतो, हें आपल्यास माहीत झालेंच आहे; तो ठराविकपणा कसा होतो, म्हणजेच कोणत्या वर्णांचे कशा प्रकारचे संधि होतात, हें कळण्यास त्याची आवश्यकता आहे. विद्वान् लोकांनीं वर्णांचा वरील दृष्टींनीं काय विचार केला आहे, तें आपण पाहूं या.

## [ २ ]

## व्यंजनें

व्यंजनांचे खालीलप्रमाणें भेद पडतात—

| | कठोर | मृदु | (अनु०) | मृदु | कठोर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कवर्ग— | क् ख्; | ग् घ् | ङ्; | ह् | | | ( कण्ठस्थान ) |
| चवर्ग— | च् छ्; | ज् झ् | ञ्; | य् | श् | | ( तालुस्थान ) |
| टवर्ग— | ट् ठ्; | ड् ढ् | ण्; | र् | ष् | ळ् | ( मूर्द्धास्थान ) |
| तवर्ग— | त् थ्; | द् ध् | न्; | ल् | स् | | ( दन्तस्थान ) |
| पवर्ग— | प् फ्; | ब् भ् | म्; | व् | | | ( ओष्ठस्थान ) |

याप्रमाणें सर्व व्यंजनें तोंडांतील वरच्या ठिकाणांपासून निघतात. त्यांच्या स्थानांचीं वरीलप्रमाणें नांवें आहेत; व स्थानांवरून त्यांचा एकेक गट किंवा वर्ग समजून त्या वर्गांना अनुक्रमें त्या त्या वर्गांतील पहिल्या वर्णावरून **क**-वर्ग, **च**-वर्ग, **ट**-वर्ग, **त**-वर्ग व **प**-वर्ग, अशीं नांवें दिलीं आहेत.

कानांला लागणारा **कोमल** उच्चार व **कर्कश** उच्चार यांवरून वरील व्यंजनांचे "**कठोर**" व "**मृदु**" असे दोन भेद आढळतात.

प्रत्येक वर्गांतील पहिलीं दोन व श्, ष्, स्, हीं "**कठोर**" व्यंजनें; आणि प्रत्येक वर्गांतील शेवटचीं तीन व ह्, य्, र्, ल्, व्, ळ्, हीं "**मृदु**" व्यंजनें आहेत.

सर्व स्वर वरील दृष्टीनें "**मृदु**"च आहेत; आणि सर्व स्वरांचींही वरीलप्रमाणेंच निरनिराळीं स्थानें आहेत. अ आ (कण्ठस्थान), इ ई (तालुस्थान), उ ऊ (ओष्ठस्थान), ऋ ॠ (मूर्द्धस्थान), ऌ (दन्तस्थान), ए ऐ (कण्ठ-तालुस्थान), ओ औ (कण्ठौष्ठस्थान). अनुस्वार– याचें (नासिकास्थान), विसर्ग– याचें (कण्ठस्थान). ह्याप्रमाणें वर्णांचे निरनिराळ्या दृष्टीनें भेद आढळून येतात.

☘ ☘ ☘ ☘

आज कोणत्या गोष्टींचा विचार केला ?

**१. स्थानांवरून सामान्यतः कण्ठ्य, तालव्य, मूर्द्धन्य, दन्त्य व ओष्ठ्य, असे एकंदर वर्णांचे पांच भेद पडतात.**

**२. कोमल व कर्कश उच्चारांच्या दृष्टीनें (१) "कठोर" व (२) "मृदु" असे वर्णांचे दोन भेद पडतात.**

---

## प्रश्न व गृहपाठ

१. वर्णांचे भेद कोणकोणत्या दृष्टींनीं पडतात ?

२. **कठोर** व **मृदु** वर्ण कोणते ? **कण्ठ्य** व **तालव्य** कोणते ?

३. **ऱ्हस्व** व **दीर्घ** स्वर कोणते ? **संयुक्त स्वर** कोणते असावेत ?

४. **अनुस्वार** व ङ्, ञ्, ण्, न्, म्, यांचीं स्थानें कोणतीं ? कां ?

---

# ६. व्यंजन-संधि

सजातीय व विजातीय स्वरांचे संधि, त्याचप्रमाणें पूर्वरूप व पररूप हे संधि, याप्रमाणें सर्व **स्वरसंधि** मागील वर्गामध्यें आपल्यास माहीत झाले; आतां व्यंजनामध्यें स्वर किंवा व्यंजनामध्यें व्यंजन मिळून, त्यांचे संधि कशा प्रकारचे होतात, त्याचा विचार करूं.

[ १ ]

आपल्याला खालील व्यंजनें माहीत आहेत; व त्यांपैकीं **कठोर** व **मृदु** व्यंजनेंही माहीत आहेत; मृदु व्यंजनांमध्यें प्रत्येक वर्गांतल्या शेवटल्या व्यंजनाचा उच्चार नाकांतही होतो, हें आपल्यास त्यांचा उच्चार करून पाहिल्यानें सहज कळेल; म्हणून त्यांना म्हणजे ङ्, ञ्, ण्, न्, म्, यांना "**अनुनासिक**" व्यंजनेंही म्हणतात.

| कठोर | | मृदु (अनु०) | | कठोर | |
|---|---|---|---|---|---|
| क् ख्; | ग् घ् ङ्; | ह् | | | |
| च् छ्; | ज् झ् ञ्; | य् | श् | | |
| ट् ठ्; | ड् ढ् ण्; | र् | ष् | ळ (मृदु) | |
| त् थ्; | द् ध् न्; | ल् | स् | | |
| प् फ्; | ब् भ् म्; | व् | | | |

हीं सर्व व्यंजनें येथें पुनः लिहून दाखविलीं आहेत, ह्याचें कारण त्यांचे **संधि** कसे होतात, तें एकदम ध्यानांत यावें.

[ २ ]

आतां खालील ठिकाणीं काय होत आहे, तें पहा—

| | |
|---|---|
| वाक् + पति = वाक्पति | क्षुध् + तृषा = क्षुत्तृषा |
| पृथक् + करण = पृथक्करण | शरद् + काल = शरत्काल |

ह्या उदाहरणांवरून असें दिसतें कीं—

[१] (अनुनासिकाशिवाय) कोणत्याही व्यंजनापुढें कठोर व्यंजन आलें असतां, पहिल्याबद्दल त्याच्याच वर्गांतलें **पहिलें कठोर व्यंजन** होतें.

आतां खालील संधि पहा—

| | |
|---|---|
| वाक् + ईश = वागीश | अप् + ज = अब्ज |
| दिक् + विजय = दिग्विजय | सत् + आचार = सदाचार |
| षट् + रिपु = षड्रिपु | षट् + आनन = षडानन |

ह्या उदाहरणांवरून खालीलप्रमाणें म्हणतां येईल—

[ २ ] ( अनुनासिकाशिवाय ) कोणत्याही व्यंजनापुढें मृदुवर्ण आला असतां, पहिल्या व्यंजनाबद्दल त्याच्याच वर्गांतलें **पहिलें मृदु व्यंजन** येतें.

याचप्रमाणें खालील संधि पहा—

| | |
|---|---|
| वाक् + मय = वाङ्मय | सत् + मति = सन्मति |
| षट् + मास = षण्मास | जगत् + नाथ = जगन्नाथ |

ह्या उदाहरणांवरून खालील नियम ठरवितां येईल—

[ ३ ] कोणत्याही व्यंजनापुढें अनुनासिक व्यंजन आल्यास, पहिल्याबद्दल त्याच्याच वर्गांतलें **अनुनासिक व्यंजन** येतें.

म्हणजे ह्या व्यंजनसंधींसंबंधीं एक ढोबळ गोष्ट अशी ध्यानांत येते कीं, ( १ ) पुढें **कठोर** आल्यास मागल्याचेंही त्याच्याच वर्गांतलें पहिलें **कठोर** होतें; ( २ ) पुढें **मृदु** आल्यास मागल्याचेंही त्याच्याच वर्गांतलें पहिलें **मृदु** होतें; व ( ३ ) पुढें **अनुनासिक** आल्यास मागल्याबद्दल त्याच्याच वर्गांतलें **अनुनासिक** होतें.

आतां खालील उदाहरणें पहा—

| | |
|---|---|
| सत् + जन = सज्जन | तत् + टीका = तट्टीका |
| सत् + चिंतन = सच्चिंतन | भगवत् + डमरू = भगवड्डमरू |
| तत् + छत्र = तच्छत्र | तत् + लीन = तल्लीन |
| सत् + °शास्त्र = सच्छास्त्र | उत् + लंघन = उल्लंघन |
| उत् + °शिष्ट = उच्छिष्ट | विद्युत् + लता = विद्युल्लता |

---

° 'त्' या व्यंजनापुढें 'श्' आल्यास, 'श्'चा अगोदर छ् होतो.

या उदाहरणांवरून असें दिसतें कीं—

[ ४ ] **त**—वर्गांतील व्यंजनापुढें **च**—वर्ग किंवा **ट**—वर्ग यांतील कठोर व्यंजन आल्यास, त—वर्गांतील व्यंजनाबद्दल अनुक्रमें **च**—वर्ग किंवा **ट**—वर्ग यांतील पहिलें **कठोर** व्यंजनच होतें; आणि मृदु व्यंजन आल्यास, पहिलें **मृदु** व्यंजन होतें. तसेंच 'ल' आल्यास, पहिल्याबद्दलही ल् च होतो.

ह्याप्रमाणें ढोबळ असे **व्यंजन-संधि** आहेत.

## [ ३ ]

आतां ( मनस् + विकार ) मनोविकार, ( रजस् + गुण ) रजोगुण, ( अधः + पतन ) अधःपतन, ( रजः + कण ) रजःकण, ( निः + अंतर ) निरंतर, ( दुः + गति ) दुर्गति, इत्यादि कितीतरी शब्द आपल्या बोलण्यांत नेहमीं येतात; ह्यांतील पहिल्या शब्दांत **विसर्ग** आहे, हें स्पष्ट दिसतच आहे; व त्यांपुढें इतर शब्दांतील वर्ण येऊन निरनिराळे संधि झाले आहेत. तेव्हां विसर्गापुढें कोणते वर्ण आले असतां काय संधि होतो, त्याची माहिती क्रमिक पुस्तकांत ते शब्द येतील, तेव्हां शिक्षकांकडून कळेल.

☘ ☘ ☘ ☘

यावरून आपल्यास काय कळलें ?

**आपल्या बोलण्यांत (१) स्वरसंधि, (२) व्यंजनसंधि, आणि (३) विसर्गसंधि असे तीन प्रकारचे संधि आढळतात.**

### प्रश्न व गृहपाठ

१. खालील संधि कराः—

सत् + विचार, बृहत् + बल, सत् + मार्ग, तत् + ज्ञ, दिक् + अंत, विद्युत् + लता, उत् + शिष्ट, उत् + लंघन, विद्युत् + जिव्हा, तत् + दृष्टि, दिक् + प्रांत, जगत् + ईश्वर, विद्वत् + जन, तत् + लीन, तत् + जठर, अप् + धि, धिक् + वचन, सत् + मौक्तिक, सत् + गति, उत् + नति, जगत् + अंड, सम् + अग्र, इत्यादि.

---

# ७. समास – १

(१) प्रथमपदप्रधान म्हणजे **अव्ययीभाव,** (२) द्वितीयपदप्रधान म्हणजे **तत्पुरुष,** (३) उभयपदप्रधान म्हणजे **द्वंद्व** आणि (४) अन्यपदप्रधान म्हणजे **बहुव्रीहि,** हे चार मुख्य समास आपल्यास माहीत झाले आहेत; त्याचप्रमाणें ज्या तत्पुरुष समासामध्यें विशेष्य व विशेषण किंवा उपमा व उपमेय हीं असतात, तो **कर्मधारय** नांवाचा महत्त्वाचा व पुष्कळ वेळां येणारा समासही आपल्या ओळखीचा झाला आहे. आतां आपण आणखी बरींचशीं उदाहरणें घेऊन ह्या समासांसंबंधीं थोडा ज्यास्त विचार करूं.

## [क]

१. द्वितीयपदप्रधान किंवा **तत्पुरुष.**

कृष्णाश्रित (कृष्णाप्रत आश्रित; **द्वितीया** विभक्तीचा लोप)

स्थानापन्न (स्थानाप्रत आपन्न; **द्वितीया** विभक्तीचा लोप)

या ठिकाणीं दुसरें पद मुख्य असल्यानें तो तत्पुरुष होय; यांत **द्वितीया** विभक्तीच्या प्रत्ययाचा लोप असल्यामुळें आपण त्याला “ **द्वितीया तत्पुरुष** ” असें म्हणूं.

ईश्वरनिर्मित ( ईश्वरानें निर्मित; **तृतीया**–लोप )
कष्टसाध्य ( कष्टानें साध्य; **तृतीया**–लोप )
भक्तिवश ( भक्तीनें वश; **तृतीया**–लोप )
तोंडपाठ ( तोंडानें पाठ; **तृतीया**–लोप )

या ठिकाणींही दुसरें पदच मुख्य असल्यानें तो तत्पुरुष समासच आहे; व यांत **तृतीया** विभक्तीच्या प्रत्ययाचा लोप दिसत आहे, म्हणून याला आपण “ **तृतीया तत्पुरुष** ” असें म्हणूं.

कृष्णार्पण ( कृष्णाला अर्पण; **चतुर्थी**–लोप )
गायरान ( गाईकरितां रान; **चतुर्थी**–लोप )
पूजाद्रव्य ( पूजेकरितां द्रव्य; **चतुर्थी**–लोप )
विद्यागृह ( विद्येकरितां गृह; **चतुर्थी**–लोप )

या ठिकाणीं दुसरें पदच मुख्य असून यांत **चतुर्थी** विभक्तीच्या प्रत्ययाचा लोप झालेला आहे; म्हणून याला आपण “ **चतुर्थी तत्पुरुष** ” असें नांव देऊं.

चोरभय ( चोरापासून भय; **पंचमी**–लोप )
गर्भश्रीमंत ( गर्भापासून श्रीमंत; **पंचमी**–लोप )
रोगमुक्त ( रोगापासून मुक्त; **पंचमी**–लोप )
जन्मस्वभाव ( जन्मापासून स्वभाव; **पंचमी**–लोप )

या ठिकाणींही दुसरें पद मुख्य असून, यांत **पंचमी** विभक्तीचा लोप झाला आहे; तेव्हां त्याला "**पंचमी तत्पुरुष**" असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं.

राजवाडा (राजाचा वाडा; **षष्ठीचा** लोप)
देवालय (देवाचें आलय; **षष्ठीचा** लोप)
केळफूल (केळीचें फूल; **षष्ठीचा** लोप)
सूर्यप्रकाश (सूर्याचा प्रकाश; **षष्ठीचा** लोप)

या ठिकाणींसुद्धां दुसरें पद मुख्य असून, यांत **षष्ठी** विभक्तीच्या प्रत्ययांचा लोप झाला आहे; म्हणून याला "**षष्ठी तत्पुरुष**" समास असें म्हणूं.

कूपमंडूक (कूपांतील मंडूक; **सप्तमीचा** लोप)
घरकोंबडा (घरांतील कोंबडा; **सप्तमीचा** लोप)
वनगाय (वनांतील गाय; **सप्तमीचा** लोप)
कलाकुशल (कलेमध्यें कुशल; **सप्तमीचा** लोप)

येथेंही दुसरें पद मुख्य आहे; व यांत **सप्तमी** विभक्तीच्या प्रत्ययांचा लोप झालेला आहे; तेव्हां याला "**सप्तमी तत्पुरुष**" समास म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

याप्रमाणें मधल्या विभक्ति-प्रत्ययाच्या गळण्यावरून तत्पुरुषाला त्या त्या विभक्तींचीं नांवें देऊन, "**द्वितीया** तत्पुरुष, **तृतीया** तत्पुरुष, **चतुर्थी** तत्पुरुष, **पंचमी** तत्पुरुष, **षष्ठी** तत्पुरुष व **सप्तमी** तत्पुरुष," असें म्हणतात.

[ ख ]

२. अन्यपदप्रधान किंवा **बहुव्रीहि.**

जितकाम ( जित आहे काम **ज्यानें; तृतीया** शेवटीं येते )

जितेंद्रिय ( जित आहेत इंद्रियें **ज्यानें; तृतीया** शेवटीं येते )

दत्तधन ( दत्त आहे धन **ज्यानें; तृतीया** शेवटीं येते )

पूरितलोककाम (पूरित आहे लोककाम **ज्यानें; तृतीया** शेवटीं येते )

या ठिकाणीं समासांतील कोणतेंही पद मुख्य नसून, निराळ्याच गोष्टीबद्दल बोलावयाचें आहे; म्हणून हा " **बहुव्रीहि** " समास आहे; परन्तु येथें विग्रहाचे शेवटीं तृतीयान्त पद घालावें लागत आहे; तेव्हां याला आपण " **तृतीया बहुव्रीहि** " असें नांव देऊं.

दशानन ( दश आहेत आननें **ज्याला; चतुर्थी** शेवटीं येते )

चतुर्मुख ( चतुर् आहेत मुखें **ज्याला; चतुर्थी** शेवटीं येते )

अष्टभुजा ( अष्ट आहेत भुज **जिला; चतुर्थी** शेवटीं येते )

चौकोन ( चार आहेत कोन **ज्याला; चतुर्थी** शेवटीं येते )

या ठिकाणींही " **बहुव्रीहि** " समास असून, शेवटीं **चतुर्थी** विभक्त्यन्त पद घालावें लागत आहे; म्हणून याला आपण " **चतुर्थी बहुव्रीहि** " समास असें म्हणूं.

निर्धन ( गेलें आहे धन **ज्यापासून; पंचमी** शेवटीं येते)

गलितपर्ण ( गलित आहेत पर्णें **ज्यापासून; पंचमी** शेवटीं येते)

निर्बल ( गेलें आहे बल **ज्यापासून; पंचमी** शेवटीं येते)

या ठिकाणीं शेवटीं **पंचमी** विभक्त्यन्त पद घालावें लागत आहे, म्हणून याला "**पंचमी बहुव्रीहि**" समास म्हणतां येईल.

| | | |
|---|---|---|
| लंबोदर | ( लंब आहे उदर **ज्याचें;** | **षष्ठी** शेवटीं येते ) |
| तपोबल | ( तप आहे बल **ज्याचें;** | **षष्ठी** शेवटीं येते ) |
| मानधन | ( मान आहे धन **ज्याचें;** | **षष्ठी** शेवटीं येते ) |
| पांढरपेशा | ( पांढरा आहे पेशा **ज्याचा;** | **षष्ठी** शेवटीं येते ) |

या ठिकाणीं **षष्ठी** विभक्त्यन्त पद शेवटीं घालावें लागत असल्यामुळें, याला "**षष्ठी बहुव्रीहि**" समास म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

| | | |
|---|---|---|
| भीमादि | ( भीम आहे आदि **ज्यांमध्यें;** | **सप्तमी** शेवटीं येते) |
| नाक | ( नाहीं अक **ज्यामध्यें;** | **सप्तमी** शेवटीं येते) |
| रामकृष्णादि | (राम-कृष्ण आहेत आदि **ज्यांमध्यें;** | **सप्तमी** शेवटीं येते) |

या ठिकाणीं **सप्तमी** विभक्त्यन्त पद शेवटीं घालावें लागत असल्यामुळें, याला "**सप्तमी बहुव्रीहि**" समास म्हणतां येईल.

म्हणजे **तत्पुरुष** व **बहुव्रीहि** या समासांचे विग्रहांत '**मध्यें विभक्ति** येणें' व '**शेवटीं विभक्ति** येणें' यावरून द्वितीया ते सप्तमी तत्पुरुष आणि द्वितीया ते सप्तमी बहुव्रीहि असे भाग पडतात.

( द्वितीया बहुव्रीहि संस्कृतांत मात्र येतो. बहुव्रीहीचे हे भाग विद्यार्थ्यांनीं सांगण्याची आवश्यकता नाहीं; तो समास ओळखतां आला म्हणजे झालें. तत्पुरुषाचे मात्र हे भाग सांगणें अवश्य आहे. )

[ **लक्ष्मीकान्त** येथें 'लक्ष्मीचा कान्त' असा विग्रह करून "**षष्ठी तत्पुरुष**" समास किंवा 'लक्ष्मी आहे कान्ता ज्याची'

असा विग्रह केल्यास, "**षष्ठी बहुव्रीहि**" समास होऊं शकेल त्याचप्रमाणें **सत्यव्रत** येथें (सत्य हेंच व्रत) "**कर्मधारय**" व (सत्य आहे व्रत ज्याचें तो) "**षष्ठी बहुव्रीहि**" असे समास होऊं शकतील; म्हणून वाक्यांत कोणत्या अर्थानें शब्द वापरला आहे, तें पाहून विग्रह करणें व त्याप्रमाणें समास सांगणें अवश्य असतें. ]

### प्रश्न व गृहपाठ

१. खालील समास विग्रह करून दाखवून ओळखा—

वसंतसमय, आम्रवृक्ष, सुरतरु, सुरवर, तरुकोटर, हिरेजडित, कनकपंजर, मांसखंड, मृगपति, वनश्री, शार्दूलादिक, राजहंस, पद्मवृंद, शारदश्री, चित्तापहारी, वारिभार, पर्वतभूप्रदेश, जलप्रवाह, जलसमृद्धि, जन्हुनरेंद्रकन्या, त्वत्तीर, त्वत्स्रोत, द्विगुणित, मुक्तकंठ, दुंदुभिनिनादसमान, चमरीसमूह, सदाचारी, इत्यादिक, इत्यादि, गणिताध्याय, देशवर्णनें, निराधार, पाषाण-हृदयी, जगन्नियंता, अनंत, अप्रतिम, गृहस्थाश्रम, धनाढ्य, स्थानभ्रष्ट, पितृभक्ति, मोदकपात्र, अन्योक्ति, पोरखेळ, वनभोजन, वडिलार्जित, मुखरस, सभाधीट, नीलकंठ, निर्लज्ज, हृतधन, प्राप्तोदक, समाप्तविद्य, हतभाग्य, महाकाय, कमल-मुखी, शशिवदना, भग्नदन्ता, तैलबुद्धि, लक्ष्मीकान्त.

## ८. समास—२

मागील पाठांत विभक्तींच्या दृष्टीनें तत्पुरुष समासाचे व बहुव्रीहि समासाचे जे भेद पडतात, त्यांचा विचार केला. आतां तत्पुरुष समासाचाच प्रथम आणखी ज्यास्त विचार करूं; व मागून द्वंद्व आणि अव्ययीभाव यांच्यासंबंधीं विचार करूं.

## कर्मधारय

**कमलमुख** ( कमलवत् मुख; मुखाला कमलाची उपमा )
**विद्याधन** ( विद्या हेंच धन; विद्येला धनाची उपमा )
**विद्युत्-लता** ( विद्युत् हीच लता; विजेला लतेची उपमा )
**तांबडमाती** ( तांबडी अशी माती; विशेषण—विशेष्य )
**काळमांजर** ( काळें असें मांजर; विशेषण—विशेष्य )
**सु-वासना** ( सु अशी वासना; विशेषण—विशेष्य )

याप्रमाणें या समासांत **दुसरें पद मुख्य** आहे; दोन्ही शब्दांची **प्रथमाच** विभक्ति आहे; **उपमा—उपमेय** किंवा **विशेष्य-विशेषण** हे त्यांचे संबंध आहेत; अशा समासाला ( तत्पुरुष किंवा प्रथमातत्पुरुष असें न म्हणतां ) " **कर्मधारय** " समास म्हणतात; हें आपल्यास मागेंच गेलें आहे. याचीं आणखी उदाहरणें—

| | | | |
|---|---|---|---|
| महाराज, | भोळानाथ, | श्यामसुन्दर, | देशान्तर, |
| महादेव, | पिठीसाखर, | मिष्टान्न, | भाषान्तर, |
| पूर्वरात्र, | उपजतगुण, | लालभडक, | दशरथराजा, |
| पूर्वचिन्ह, | रडतराऊत, | नीलोत्पल, | तारामतीबाई, |
| रक्तचंदन, | साडेतीन, | पुरुषोत्तम, | चरणकमल. |

## द्विगु

आतां खालील उदाहरणें पहा व त्यांत कोणती गोष्ट विशेषतः आढळून येते, तें ठरवा.

**त्रिभुवन** ( तीन भुवनांचा समुदाय; विशेषण—विशेष्य )
**त्रिलोक** ( तीन लोकांचा समुदाय; विशेषण—विशेष्य )

पंचपाळें ( पांच पाळ्यांचा समुदाय; विशेषण–विशेष्य )
चातुर्मास ( चार महिन्यांचा समुदाय; विशेषण–विशेष्य )
अष्टाध्यायी ( आठ अध्यायांचा समुदाय; विशेषण–विशेष्य )
त्रिदल ( तीन दलांचा समुदाय; विशेषण–विशेष्य )

ह्या ठिकाणींही दुसरें पद मुख्य असून, पहिलें संख्यावाचक विशेषण व दुसरें विशेष्य आहे; आणि त्या दोहोंमिळून समुदायाचा अर्थ कळत आहे. विशेष्य–विशेषणें यांत असल्यामुळें यालाही "कर्मधारय" समास म्हणावयाला हरकत नाहीं; परन्तु ह्या अशा प्रकारच्या पहिलें पद संख्यावाचक व एकंदरींत समुदायाचा अर्थ असणाऱ्या समासाला "**द्विगु**" समास असें म्हणण्याची चाल पडली आहे. आपणही तोच प्रघात चालू ठेवणें बरें. ( यांत जरी अनेक वस्तूंच्या समुदायाचा अर्थ असला, तरी द्विगु समास असलेला शब्द एकवचनीच असतो. )

खालील आणखी शब्द पहा व त्यावरूनही कोणती गोष्ट विशेषत: आढळून येते, तें ठरवा—

## मध्यमपदलोपी

साखरभात ( साखरयुक्त भात; विशेषण–विशेष्य )
भोजनभाऊ ( भोजनापुरता भाऊ; विशेषण–विशेष्य )
बाळमित्र ( बाळपणापासूनचा मित्र; विशेषण–विशेष्य )
पुरणपोळी ( पुरणयुक्त पोळी; विशेषण–विशेष्य )
घोडेस्वार ( घोडा असलेला स्वार; विशेषण–विशेष्य )
चुलतभाऊ ( चुलत्याचे द्वारा झालेला भाऊ; विशेषण–विशेष्य )
नातसून ( नातवाची बायको म्हणून सून; विशेषण–विशेष्य )

ह्या ठिकाणींही दुसरें पद मुख्य आहे; आणि ह्या पदांचा विशेष्य-विशेषण ह्या नात्यांचा संबंध आहे; परन्तु येथें त्या दोन पदांचा विग्रह करितांना मध्यें घालावे लागणारे कांहीं शब्द गाळले आहेत, असें दिसून येतें; एवढाच फरक आहे. या समासांनाही कर्मधारयच म्हणण्यास हरकत नाहीं; परन्तु अशा प्रकारच्या समासांना 'मधलें पद गळलें जातें' म्हणून "**मध्यमपदलोपी**" समास असें म्हणण्याची रूढि पडली आहे. अर्थात् आपणही तेंच नांव कायम ठेवूं.

म्हणजे एका तत्पुरुष समासामध्यें "**कर्मधारय**" समास आपल्यास नेहमीं येणारा म्हणून त्याच नांवानें ध्यानांत ठेवावयास पाहिजे; आणि त्या कर्मधारयांतच पहिला शब्द संख्यावाचक असून, दोन्ही शब्दांमिळून समुदायाचा अर्थ कळत असेल, तर त्यास "**द्विगु**" समास म्हटलें पाहिजे; तसेंच, त्यांत मधल्या पदाचा लोप होत असेल, तर त्यास "**मध्यमपदलोपी**" असें प्रचारांतलें नांव आपण वापरावयास पाहिजे; ह्या गोष्टी आपल्यास वरील विचारावरून कळून आल्या.

[ ग ]

३. उभयपदप्रधान किंवा द्वंद्व.

| | | |
|---|---|---|
| रामकृष्ण, | हरिहर, | या समासांत दोन्ही पदांना प्राधान्य असतें व मधल्या **आणि, व, अथवा, किंवा,** या शब्दांचा लोप झालेला असतो; |
| कटकमुकुट, | भीमार्जुन, | |
| न्यायान्याय, | खरेंखोटें, | |
| घरदार, | भाजीपाला, | |

विग्रहाचे वेळीं ते शब्द घालून फोड करावी लागते; अशा समासाला "**द्वंद्व**" समास असें म्हणतात, हें आपल्यास मागेंच माहीत झालें आहे. याचीं आणखी उदाहरणें—

| | | | |
|---|---|---|---|
| आईबाप, | विटीदांडू, | एकवीस, | मीठभाकर, |
| बहीणभाऊ, | कुलूपकिल्ली, | बेवीस, | कोळीमाळी, |
| नाकडोळे, | दौतलेखणी, | बत्तीस, | शेटसावकार, |
| स्त्रीपुरुष, | सहाणखोड, | सुरूपकुरूप, | पानपत्रावळ, |
| बापलेक, | पळीपंचपात्री, | भलाबुरा, | केरकचरा. |

[**भाजीपाला** म्हणजे भाजी, पाला व त्यासारखे आणखी पदार्थ; **मीठभाकर** म्हणजे मीठ, भाकर व तसे आणखी पदार्थ; अशा प्रकारच्या द्वंद्व समासाला "**समाहारद्वंद्व**" असें म्हणतात.]

## [ घ ]

४. प्रथमपदप्रधान अथवा **अव्ययीभाव.**

प्रतिवर्ष, दररोज, यथान्याय, यथाशास्त्र, घरोघर, गांवोगांव, } यांत विशेषत: पहिला शब्द अव्यय असतो व तो प्रमुख असतो; आणि सर्व शब्द क्रियाविशेषण अव्यय होतो; यांपैकीं कोणत्या तरी गोष्टी असतातच, तरच तो "**अव्ययीभाव**" समास होतो. याचीं आणखी उदाहरणें—

| | | | |
|---|---|---|---|
| यथाशक्ति, | प्रतिदिन, | घरोघर, | दिवसेंदिवस, |
| यथाविधि, | प्रतिक्षण, | घडोघडीं, | हरवक्त, |
| यथायोग्य, | आजन्म, | पावलोपावलीं, | बेशक, |

यथाक्रम, यावज्जीव, रस्तोरस्तीं, बेमालूम,
यथावकाश, व्यर्थ, गल्लोगल्लीं, दरमजल.
या समासाचा विग्रह करण्याचें कारण नाहीं.

---

## प्रश्न व गृहपाठ

१. "**अव्ययीभाव**" व "**द्वंद्व**" हे समास कसे ओळखावे ?

२. "**कर्मधारय,**" "**द्विगु**" व "**मध्यमपदलोपी**" यांत फरक काय ?

३. खालील शब्दांतील समास सविग्रह सांगा—

**पाऊसपाणी, पंचवटी, नवरात्र, भोळानाथ, एकोणीस, रडतराऊत, गांवोगांव, दरकूच, दरमजल, बेमालूम, बेशक, यावज्जीव, यथाकालीं, समोरासमोर, खालोखाल, रामदयाळ, रूपान्तर, अहंबुद्धि, देवर्षि, राजर्षि, शुक्लकृष्ण, आतेभाऊ, नातजांवई, पांचशेरी, छटाक, दुर्व्यसन, कुयोग, निराशा, स्वल्प, बारभाई, चौघडी, पुरणपोळी, डाळवांगें, कमलनेत्र, इंदुमुख, चंद्रवदन, नरसिंह, वज्रदेह, मुखकमल, नरशार्दूल, पुरुषव्याघ्र, मुखेंदु, संसारसागर, चरणारविंद, पदपद्म, शेटसावकार, आदरातिथ्य, दगडबिगड, आहारनिद्राभय, विटीदांडू, सुकुमार, सत्कृत्य, सदाफुली, दुःसाध्य, दुराचार, आगबोट, कस्तूरीमृग, उत्तरपूजा, पढतमूर्ख, आंबटओला, अडेलतट्टू, सव्वापांच, आरसेमहाल, पंचांग, साखरलिंबू, काळासावळा, बिनचूक, अहोरात्र, अहर्निश, तीव्रहिम, सुस्वर, खरतर-नखर, मृतपशु, मंगलप्रद, समसम, वर्षर्तु, मधुर-फलभरें, भारतखंड, गुरु-वारिभार, सस्यफलपुष्प, पूर्वकाल, स्वर्लोक, अतिवृष्टि, शुभ-चमरीसमूह, कलध्वनि, रीतरिवाज, पन्नास-पाउणशें, बाळडोंगर, प्रधानपंत, प्रसंग-विशेष, व्याजस्तुति, गुरेंढोरें, संतमंडळी, दानधर्म, शिरापुरी, होमहवन, हास्यमुख, फुल्लकमल, सडासंमार्जन.**

---

# ९. पद्यविशेष – १

## [ १ ]

आतांपर्यंत आपण गद्यभाषेंतील शब्दांच्या स्वरूपासंबंधाचा विचार केला. पद्यांत केव्हां केव्हां गद्यापेक्षां निराळ्या प्रकारचीं शब्दांचीं रूपें आढळतात; त्यांसंबंधाचा आतां विचार करूं.

१. कधीं कधीं कवि वृत्ताच्या जुळणीसाठीं ऱ्हस्वाचीं दीर्घ व दीर्घाचीं ऱ्हस्व अक्षरें करितात.

तनू त्यागितां कीर्ति मागें उरावी ।
मना सज्जना हेचि क्रीया धरावी ॥
जगीं सर्वसूखी असा कोण आहे ? । —( रामदास )
म्हणुनि बहुत पंक्ती मंडलाकार केल्या । —( वामन )
कोठें भयाचा जरि लेश वाटे ।
द्विरेफ मोदें मजलागिं भेटे ॥
कांहीं तुझ्यासाठिंच मात्र नाहीं । —( लोंढे )
नाहिं तरी काय थोडीं । श्वानसूकरें बापुडीं ॥ —( तुकाराम )
जाते घडि ही अपुली साधा ।
करा काय तें अतां करा । —( ह० ना० आपटे )
नेदी चित्ता शांती ऐशी विद्या काशाला ? ।
नेघे हरिचें नाम तरी ती जिव्हा काशाला ? ॥ —( हरिकवि )
कवळिति निजबंधू बाष्पबिंदू गळाले । —( रघु० पंडित )

[ २ ]

## २. **विभक्तिरूपें.**

कवितेंत केव्हां केव्हां '**ऊ**' कारान्त व केव्हां केव्हां '**ओ**' कारान्त अशीं **प्रथमेचीं रूपें** आढळतात.

नातरी इक्षुदंडू । पाळी तयासचि गोडू ।। —( ज्ञानेश्वर )
नकोरे मना मत्सरू दंभभारू । —( रामदास )
भूगोल हा उलथितां मज नाहिं वेळू । —( आनंदतनय )
धन्य धन्य हा नरदे**हो** । येथील अपूर्वता पहाहो ।।
जो जो कीजे परमार्थला**हो** । तो तो पावे सिद्धीतें ।।—( रामदास )
उपजला भा**वो** । तुझे कृपें सिद्धी जावो ।। —( तुकाराम )
तिसरा जो कां आजानुबा**हो** ।
जो द्रौपदीचा तिसरा ना**हो** ।
जेणेंकरूनि खांडवदा**हो** ।
तोषविलें त्रिपादातें ।। —( मुक्तेश्वर )
देहे बुद्धिचा निश्च**यो** तो ढळेना ।। —( रामदास )

**द्वितीया**—

उत्तमा**तें** धरिजे । अधमा**तें** अव्हेरिजे ।
हें कांहींच नेणिजे । वसुधा जेंवि ।। —( ज्ञानेश्वर )
सत्या**तें** जोडावें सुज्ञें धर्मा**सि** पळ न सोडावें । –( मोरोपंत )
गृहसुतधनदारा । यां**तें** भुलतोसी पामरा ।। —( तुकाराम )

गद्यांत '**तें**' हा द्वितीयेचा प्रत्यय लागलेला आढळत नाहीं; तो येथें पद्यांत लागलेला दिसत आहे. त्याचप्रमाणें निर्जीव वस्तूलाही ह्या ठिकाणीं **स-ला-तें** हे प्रत्यय पद्यांत लागलेले दिसत आहेत.

**तृतीया—**

या विभक्तीचे एकवचनी '**एं**' व अनेकवचनी '**ईं**' '**हीं**' हे प्रत्यय कवितेंतच विशेषत: येतात.

रा**में** लोकाभिरा**में** मदनशतस**में** पूर्ण-कल्याणधा**में** ।
लीलाभूभृल्ल**ामें**, तुकुनि शिवधनू ओढिलें पूर्णका**में** ।।-(आनंद०)
फडफड निजप**क्षीं** दाविलें कीं उडाया । —(रघु० पं०)
गरुड जसा गगनांतुनि **वेगें** उतरून पन्नगा झडपी ।-(मोरोपंत)
**द्विजीं** निषधापासाव म्हणीजेलें । —(रघु० पंडित)
यां**हीं** धेनु वळाव्या शिवशिव गोपाळ रामकृष्ण हरे ! ।।-(मोरोपंत)
गर्वोद्धतांसहि जि**हीं** मदहीन केलें । —(कवि [?])
सत्संगति सुगुणां**हीं** सर्वांही स्वाश्रितांसि शोभवि ती ।-(मोरोपंत)

**चतुर्थी—**

द्वितीयेप्रमाणेंच चतुर्थीचे गद्यांत न आढळणारे '**तें**' व '**सी**' हे प्रत्यय पद्यांत आढळतात.

ज्याशीं समग्र जगतींत तुळावया**तें** ।
नाहींच अन्य गिरि योग्य म्हणून ज्या**तें** ।।
खाणींत सांपडति यास्तव संपदे**तें** ।
न्यूनत्व या जनपदीं न कधींहि येतें ।।

होतां क्षणीं नयनगोचर नास्तिकांतें- ।
देखील विश्वपति ईश्वर मानण्यातें ॥ —(चिंतामणि पेठकर)

**पंचमी**—

कवितेंत ऊन, हून, ह्या प्रत्ययांबद्दल केव्हां केव्हां **ऊनी, हूनी,** हीं रूपें सोयीप्रमाणें ऱ्हस्व-दीर्घ होऊन, येतात.

मृदु पातें हंस उडे काका**हुनि** हीन शक्तिसा भासे ।—(मोरोपंत)
किंबहुना माते**हुनि** अधिक हिची योग्यता असे खचित ।–(मोगरे)

**षष्ठी**—

कवितेंत '**च्या**' बद्दल केव्हां केव्हां '**चिया**' असें रूप आढळतें.

निंबा**चिया** झाडा साखरेचें आळें । —(तुकाराम)
आपु**लिया** बळें नाहीं बोलवत । —( " )
कीं घरीं**चिया** उजेड करावा । —(ज्ञानेश्वर)
सोनि**याचा** तो नवल हें विलोकीं । —(रघु॰पंडित)
भेटि घेती वैदर्भ राज**याची** । —( " )
चित्त लागियलें **तूझिया** लगामीं । —( " )

**सप्तमी**—

'**आं**' हा प्रत्यय विशेषेंकरून कवितेंत आढळतो.

त्याच्या ग**ळां** माळ असो नसो ।
ग**ळां** तुळशीहार कासे पीतांबर ।
नाहीं तरी देऊं कासेची लंगोटी ।
नाठाळाचे काठी हाणूं माथां ॥ —(तुकाराम)

[ ३ ]

## ३. क्रियापदरूपें.

[क] मन्मतिदरींत न **शिरे** कोपमतंगज विवेक हरि **जागे**।–( मोरोपंत )

भ्याले यास भट जसे **भीती** गजशिशु, मृगोत्तमारावा।–( ” )

**करिसी** बरोबरी तूं हंसाची काय वायसापसदा ? । –( ” )

करूं **ये** ( येतें ) समाधान जो मूर्ख त्याचें।

धरूं **ये** ( येतें ) सुखें चित्त पै जाणत्याचें॥ —( वामन )

न **जाणे** (जाणत नाहीं ) न **नेणे** ( नेणत नाहीं ) अशा पामराला।

बुझावूं **शके** ना ( शकत नाहीं ) विधाता तयाला॥ –( वामन )

या ठिकाणीं क्रियापदाचीं “**वर्तमान काळाचीं**” रूपें आहेत; परन्तु अशाच रूपांचा इतर काळींही उपयोग होतो. उदा०—

[ख] शब्दभाव बळिलाहि **ना कळे** ( कळला नाहीं )।

शुक्र सन्निध तयासि तो **कळे** ( कळला )॥

**ये** ( आला ) अशांत सदनांत हरी तो।

जो अनादि भय-शोक हरी तो॥ —( वामन )

**पाहे** ( पाहता झाला ) तीस नृप **म्हणे** ( म्हणाला ),

मग मुनिला गाय मागतों द्या हे।

अधिकन्नि **माजे** ( माजला ) स्तवनें,

न विचार **करी** ( न करिता झाला ) मलीमसाचार।–(मोरो०)

येथें ठळक अक्षरांतील क्रियापदांचा “**भूतकाळीं**” उपयोग झाला आहे.

[ग] त्या वैश्यकुमारांचें **भक्षी** ( भक्षीत असे )

उच्छिष्ट एक काक सदा ।

मधु, घृत, पायस, वायस, **खाय** ( खात असे )

सदा पक्षियांसवें **भांडे** ( भांडत असे ) । —( मोरोपंत )

येथें ठळक अक्षरांतील क्रियापदांचा "**रीतिभूतकाळीं**" उपयोग झालेला आहे.

[घ] सत्य धरितां निर्धार । काय न **करी ?** ( न करील ) विश्वंभर ।

आतां मज ऐसें **करीं** । तुझे पाय चित्तीं **धरीं** (धरीन) ।- (तुकाराम)

कसा त्या नादातें क्षणभरिहि तो पामर **करी ?** (करील)-(कृ० चि०)

तुका म्हणे माझ्या जीवा । कधीं **भेटसी?**(भेटशील) केशवा ॥-(तु०)

न **धरीं** ( धरणार नाहीं ) शस्त्र करीं मी,

गोष्टी सांगेन युक्तिच्या चार । —(मोरो०)

देव **करी** ( करील ) तरी काय एक **नोहे ?** ( होणार नाहीं )—(तु०)

येथें ठळक अक्षरांतील क्रियापदांचा " **भविष्यकाळीं** " उपयोग झालेला आहे.

## प्रश्न व गृहपाठ

१. खालील ठळक शब्दांमध्यें गद्यांतल्यापेक्षां कोणती विशेष गोष्ट आढळून येते, ती स्पष्ट करून सांगा—

( १ ) **ईशें** जी पांच भूतें केलीं. ( २ ) ज्यांच्या **योगेंच** हे बहुसुख ऋतु **येती.** ( ३ ) विस्मरा त्या न **मोहें.** ( ४ ) **करीं** उष्णा जला **तोषवी.** ( ५ ) तूं प्रभूच्या **स्तवातें करीं.** ( ६ ) **मोदें** प्रभुस्तव करोत निजस्वनांत. ( ७ ) तसें **त्वत्कृपें** पाप माझें जळावें. ( ८ ) न **सोडी** हा नळ भूमिपाळ **मातें** ( ९ ) असें जाणोनी हंस **वदे त्यातें** ( १० ) **हंसहिंसा**

नच घडो **तुझ्या हातें.** (११) सुटुनि खग पळाला बैसला **शालशाखे** (१२) क्षणभरि निजदेहीं मुक्तिविश्रांति **चाखे.** (१३) ऐक; राया, तूं थोर **दयासिंधू.** (१४) नीतिसागरही तूंचि दीन**बंधू.** (१५) **सोनियाचा** तो नवल हे विलोकीं. (१६) तशा मजलाही सोडिलें **तुवां** कीं ! (१७) तुझा ऐसा उपकार मी न **झांकीं.** (१८) चित्त लागियलें **तूझिया** लगामीं. (१९) **राहे** चित्तीं प्रिय मम परी **जन्मभूमी** सदैव. (२०) ठेवीन मी **पायां** मस्तक हें. (२१) **दह्याचिया** अंगीं **निघे** ताक लोणी (२२) एका **मोलें** दोन्ही मागूं नये. (२३) द्रोणद्रौणिकृपादि प्रबळ बहु भटांसही न तो **आटे** (२४) **फाटे** तद्दृष्टिपुढें बळ जलदीं मूर्त वातसा **वाटे.** (२५) सौभद्र विरथ होतां धर्मज्ञहि करिति **शस्त्रवृष्टीतें** (२६) ते निष्कपटत्व पाहुनि झांकिति बहु सदय साधु **दृष्टीतें.** (२७) कीं **ज्यांहीं** स्वकृतोपकारविभवें सर्वत्र विस्तारिली. (२८) **लोकांचिये** एक शिरीं सजावे.

---

# १०. पद्यविशेष – २

## [ १ ]

### ४. विभक्तीकरितां **मूळरूप** किंवा **सामान्यरूप.**

पद्यांत बरेच वेळां विभक्तिप्रत्यय न लागतां त्याचें काम नुसत्या मूळ शब्दानें किंवा त्या त्या विभक्तींच्या प्रत्ययाभावी सामान्यरूपानें भागतें.

[अ] तृ०–स्वकरें चंदन घाशी गंगेचें पाणि **कावडी** (नें) भरितो ।
” उद्धवें विनविल्यावरी । **कृपा** ( नें ) कळवळला श्रीहरी ॥

**च**०—तेवीं नमी सीता । आनंदित चित्ता ॥

”  मग हो बोलता । राम **मुनी** ( ला ) ॥

”  सत्कर्म **सिद्धी** (स) गेलें । तरी फुगेना म्यां हें केलें ॥

**ष**०—तुझिये **माया** ( मायेची ) विचित्र उपाधी ।
शरीरीं केली आत्मबुद्धी ॥

**स**०—मज नांदतां ये **सृष्टी** ( त ) ।
कळी उघडूं न शके दृष्टी ॥

येथें विभक्तींकरितां **मूळरूपच** योजिलें आहे.

[ आ ] **द्वि**०—साष्टांग वंदी **रघुराज-पायां** ( ना ) ।

”  गरुड जसा गगनांतुनि वेगें उतरोनि **पन्नगा**(ला) झडपी ।

**तृ**०—स्वयें सर्वदा नम्र **वाचे** ( नें ) वदावें ।

”  गुण गाईन **आवडी** ( नें ) । हेचि माझी सर्व जोडी ॥

”  त्यांचा होम **मारणविधी** ( नें ) करूं पाहसी काय तूं ? ।

**च**०—**रामा** वन **भरता** सिंहासन देइन जाण तरीच खरी मी ।

”  **युद्धा** (स) निघाला पार्थकुमार ।

”  वदे कृष्ण **गोपाळबाळां** जनांतें ।

**ष**०—पारधीमाजी **खगां** ( ची ) **मृगां** ( ची ) राजे ।
करिति हिंसा जी तीच बरी साजे ॥

”  आम्रा त्या पिक सेवितां **समसमां**(चा)संयोग कीं जाहला

**स**०—आननपंक्ति **धरे** ( वर ) रचली ।

**येथें विभक्तीकरितां सामान्यरूप योजिलें आहे.**

[ २ ]

## ५. विशेष्य–विशेषण.

पद्यांत केव्हां केव्हां संस्कृताप्रमाणें विशेष्याला लागणारे विभक्ति-प्रत्यय विशेषणालाही लागलेले आढळतात; असा प्रकार गद्यांत आढळत नाहीं. उदा०—

द्वि०—तो भीम भीमकर्मा गांठी त्या **रिपुसि भूमिगलितासी** ।
तृ०—गुरुनें सकळ पळविले गज जेंवि **मृगेश्वरें समन्यूनें** ।
"  **कृतघ्नें शत्रुघ्नें** प्रबल रिपु पाहोनि नयनीं ।
"  **रामें लोकाभिरामें मदनशतसमें पूर्णकल्याणधामें** ।
ष०—लज्जावती फार तथापि **त्याची** ।
"  शंका न सीता धरि हो **पित्याची** ॥
स०—**अत्युच्चीं पदिं** थोरही बिघडतो हा बोल आहे खरा ।
"  हिरेजडित **सुंदरीं कनकपंजरीं**ही वसे ।

६. **ही, जी, ती,** या स्त्रीलिंगी रूपांबद्दल कवितेंत केव्हां केव्हां **हे, जे, ते,** अशीं रूपें येतात.

वधुनि माझी **हे** ( ही ) कनकरूप काया ।
श्रीवामनैकपद सर्व वसुंधरा **हे** ( ही ) ।
विद्या भोगसुकीर्तिदायक पहा **ते** (ती) मान्य मान्यांसही ।
पुंष्पापरी दों परिचीच साची । **हे**(ही) वृत्ति संभावित जे तयांची ॥

७. केव्हां केव्हां संस्कृताप्रमाणें पद्यांत '**आ**'-कारान्त स्त्रीलिंगी विशेषणें आलेलीं आढळतात.

ती **तीव्र-दक्षिण-समीर-समीरिता** जी ।
वर्षाऋतूंत नवनील—पयोद—राजी ॥
सत्संगति बहु **मान्या** थोराहुनि बहु दया करि, लहानीं ।
तत्रापि **प्रथिततरा** तिहींहि लोकीं ।
त्या दोघींतुनि पहिलीच राहते कीं ॥
तरी तव **मनोहरा** कृति जरीहि **साधारणा** ।
दया प्रकट दाविते अतुल शक्ति माझ्या मना ॥
कोपानें वदली न ती कटुवचें **शांता** सदा राहिली ।
बा, मूर्च्छा पावले **अदभ्रा** ते ।

८. क्वचित् एकवचनी स्त्रीलिंगी रूपाकरितां कवितेंत 'रुच**ते**' याचे ऐवजीं 'रुच**ती**' अशा प्रकारच्या रूपांचा उपयोग आढळतो.

**रुचती** (ते) कां तीर्थयात्रा या समयीं त्यांस ती ।
दादांना अंधजाची प्रीती कां **लागती** ? (ते) ।
ज्याच्या पदरीं पुण्य प्रचुर विमल बहु तयासि **लोभविती**(ते)।

[ ३ ]

## ९. प्रथम व द्वितीय पुरुषीं कर्मणिप्रयोग.

गद्यांत कर्माचे ठिकाणीं **मी, आम्ही**; किंवा **तूं, तुम्ही**; हे शब्द प्रथमा विभक्ति असतां कधींच येत नाहींत; यामुळें गद्यांत

कर्मणिप्रयोग असतां **प्रथमपुरुषीं** व **द्वितीयपुरुषीं** क्रियापद आढळत नाहीं; परन्तु पद्यांत तसें पुढील ठिकाणीं आढळून येतें.

| | |
|---|---|
| ( १ ) इंद्रियांचीं दीनें,<br>"**आम्ही**" केलों नारायणें. | यांत **नारायणें** हा कर्ता, "**आम्ही**" हें कर्म, केलों हें क्रियापद; हा **कर्मणिप्रयोग.** |
| ( २ ) जाउनि तो दूत म्हणे,<br>"कृष्णे, द्यूतांत '**तूं**'<br>स्वयें धर्में । हारविलीस,<br>सुयोधन-सदनाप्रति ये<br>करावया कर्में" ॥ | या ठिकाणीं **धर्में** हा कर्ता, "**तूं**" हें कर्म, हारविलीस हें क्रियापद; हा **कर्मणिप्रयोग.** |
| ( ३ ) प्रद्युम्न म्हणे, "केलों<br>पूर्वीं ऐसाचि '**मी**'<br>हरें काय ?" । | यांत **हरें** हा कर्ता, "**मी**" हें कर्म, केलों हें क्रियापद; हा **कर्मणिप्रयोग.** |
| ( ४ ) प्रेमें रक्षितिल सदा<br>म्हणुनि दिलें "**मी**"<br>जयांसि मत्तातें । | यांत **मत्तातें** हा कर्ता, "**मी**" हें कर्म, दिलें हें क्रियापद; हा **कर्मणिप्रयोग.** |

याप्रमाणें पद्यांत सामान्यतः गद्यापेक्षां निराळे प्रकार आढळतात; ते ध्यानांतच ठेवावयास हवेत.

## प्रश्न व गृहपाठ

१. ठळक शब्दांमध्यें गद्यांतल्यापेक्षां निराळी अशी कोणती गोष्ट आढळून येत आहे?

(१) **तयां** माराया धैर्य धरीं पोटीं, (२) पांखरूं **हे** मारणें बुद्धि खोटी. (३) विवश करी ती **दुष्परिहार्या** जेंवि प्रभोगदाघाली. (४) असे चक्षु जो सूर्य **सर्वां** जगाचा. (५) **शोभे विजयोत्साहें** अभिमन्युमुख प्रफुल्ल-पुष्करसें. (६) सत्संगति **सुगुणांहीं** सर्वांही स्वाश्रितांसि शोभवि ती. (७) जेणें त्या **मानसातें** त्यजुनि वरियलें पंकिला **पल्वलातें.** (८) म्हणुनी औषध कांहीं **पुत्रीं** देऊं नये तिला काय? (९) कांता काय वदों नवप्रसव **ते सातां** दिसांची तशी. (१०) **सोडी; म्हणे, विहर, जा;** अथवा फिराया. (११) आहे त्याच्या त्वरित **गमना** विघ्न हें दुर्निवार. (१२) केली **विप्रकृता** जरी प्रियसखी **रुष्टा** न ती जाहली. (१३) असे अंतरात्मा **समग्रां** जिवांचा. (१४) ज्या ज्या **शस्त्रधरीं तुम्हीं नृपशुंनीं** दुष्कर्म आरंभिलें.

# २

# शब्द–घटना

## ११. उपसर्ग व प्रत्यय

### [ १ ]

मराठींत संस्कृत शब्द पुष्कळच येतात, व ते बहुतेक संस्कृतांतील मूळ धातूंपासून बनलेले असतात, हें आपल्यास ऐकून माहीत आहे; परन्तु त्यांच्या बनावटीविषयीं आपणही थोडासा विचार येथें करूं.

| | मागें अक्षरें. | | धातु. | | पुढें अक्षरें. | | शब्द. | अर्थ. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | रम् | + | अ | = | राम | (आनन्द देणारा) |
| | आ | + | रम् | + | अ | = | आराम | ( विश्रान्ति ) |
| २. | | | मन् | + | ति | = | मति | ( विचारशक्ति ) |
| | सु | + | मन् | + | ति | = | सुमति | ( चांगली बुद्धि ) |
| ३. | | | गम् | + | अन | = | गमन | ( जाणें ) |
| | आ | + | गम् | + | अन | = | आगमन | ( येणें ) |
| ४. | | | वद् | + | अ | = | वाद | ( बोलणें ) |
| | सम् | + | वद् | + | अ | = | संवाद | (संभाषण करणें) |
| ५. | | | अय् | + | अन | = | अयन | ( जाणें ) |
| | अधि | + | अय् | + | अन | = | अध्ययन | ( शिकणें ) |

वरील शब्दांच्या बनावटीकडे लक्षपूर्वक पाहिल्यास दिसून येईल कीं, संस्कृत धातूंच्या **मागें** (अधि, आ, सम्, सु) अशीं कांहीं अक्षरें लागून, शब्द बनले आहेत; त्याचप्रमाणें धातूंच्या **पुढेंही** कांहीं अक्षरें लागून, शब्द बनले आहेत. ह्या पुढें लागणाऱ्या अक्षरांना "**प्रत्यय**" म्हणतात, हें आपल्यास माहीतच आहे. पुढें अक्षरें येऊन म्हणजे धातूला "**प्रत्यय**" लागून संस्कृत शब्द कसे बनतात, त्याचा पुढील पाठांत विचार करूं. सध्यां धातूच्या **मागें** जीं अक्षरें लागतात, तीं काय काम करितात, तें पाहूं या.

[ २ ]

१. हृ + अ = हार (हरण करणें)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| आ | + | हार | = | आहार (खाणें) |
| वि | + | हार | = | विहार (खेळणें) |
| सम् | + | हार | = | संहार (ठार मारणें) |
| प्र | + | हार | = | प्रहार (तडाका देणें) |
| अप | + | हार | = | अपहार (गिळंकृत करणें) |
| उत् | + | हार | = | उद्धार (वर आणणें) |
| परि | + | हार | = | परिहार (निवारण करणें) |

या प्रत्येक ठिकाणीं 'हृ' या धातूच्या **मागें** निरनिराळीं अक्षरें लागलेलीं दिसत आहेत; व त्यामुळें 'हृ' धातूचा मूळ अर्थ जो 'हरण करणें' तो प्रत्येक वेळीं बदलून, (खाणें, खेळणें, ठार मारणें, तडाका देणें, गिळंकृत करणें, वर आणणें, निवारण करणें,)

असे धातूच्या मागें निरनिराळीं अक्षरें लागल्यानें, निरनिराळे अर्थ झाले आहेत; त्या **मागें** लागलेल्या अक्षरांनीं धातूचा मूळचा अर्थ बदलविला आहे; असें दिसून येतें.

तसेंच खालील ठिकाणींही पहा—

२. कृ + अ = कार ( करणें )

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अधि | + | कार | = | अधिकार | ( प्रमुखपणा ) |
| अप | + | कार | = | अपकार | ( वाईट करणें ) |
| आ | + | कार | = | आकार | ( आकृति ) |
| उप | + | कार | = | उपकार | ( मदत करणें ) |
| प्र | + | कार | = | प्रकार | ( भिन्नता दाखविणें ) |
| प्रति | + | कार | = | प्रतिकार | ( उलट करणें ) |
| वि | + | कार | = | विकार | ( बदल होणें ) |
| सम् | + | कार | = | संस्कार | ( चांगलें करणें ) |

येथेंही ‘ कृ ’ धातूच्या **मागें** निरनिराळीं अक्षरें लागून, त्यांमुळें दरेक वेळीं त्यांसह असलेल्या धातूचा अर्थ बदललेला आढळून येत आहे.

यावरून हीं संस्कृत धातूंच्या मागें लागणारीं कांहीं ठराविक अक्षरें धातूचा मूळचा अर्थ फिरवितात; व धातूच्या मागें लागून, त्याला एक प्रकारें त्रास देतात; असें झालें. त्रास देणें म्हणजे दुसऱ्याला उपसर्ग देणें. यावरून अशा शब्दांनाही “ **उपसर्ग** ” असेंच म्हणतात. त्याचें धातूचा अर्थ बदलविणें, हें मुख्य कार्य आपल्यास आतां माहीत झालें.

[ अति, अधि, अनु, अप, अपि, अभि, अव, आ, उत्, उप, दुर्, दुस्, नि, निर्, निस्, परा, परि, प्र, प्रति, वि, सम्, सु, हे २२ उपसर्ग आहेत. ]

---

## प्रश्न व गृहपाठ

१. अति, परा, सु, दुर्, निस् आणि वि, ह्या उपसर्गांनीं बनलेले तीन तीन शब्द घरून लिहून आणा.

२. " **उपसर्ग** " म्हणजे काय व ते काय काम करितात ?

३. खालील शब्दांतील उपसर्ग व पुढील शब्द शिक्षकांच्या साह्यानें वेगळे काढून पहा व त्या शब्दांचे योग्य अर्थ समजून घ्या—

अनुवाद, विवाह, दुःशासन, दुर्विलास, निरपेक्ष, निर्विकार, विपत्ति, संपत्ति, आपत्ति, परिहार, प्रतिभा, परावृत्त, पराजित, अपशब्द, अपपाठ, अनुरूप, अवलक्षण, सुभद्रा, सुलभ, सूक्ति, आगमन, उपलब्ध, उपवास, विराम, आराम, आक्षिप्त, विक्षिप्त, प्राक्षिप्त, निरंकुश, निरीक्षण, निर्लोभ.

४. पुढील शब्दांतील उपसर्ग शोधण्याचा प्रयत्न कराः—अध्यापन, व्याकरण, प्रत्यागमन, उपोद्घात.

---

# १२. प्रत्ययघटित संस्कृत शब्द–१

संस्कृत मूळ धातूला मागें **उपसर्ग** व पुढें **प्रत्यय** लागून शब्द बनतात; हें आपल्यास मागील पाठावरून दिसून आलें. त्यांपैकीं धातूस ' उपसर्ग ' लागून कसे शब्द बनतात, याचा विचार

आपण केला. आतां धातूला ‘ प्रत्यय ’ लागून शब्द कसे बनतात, ह्याविषयीं कांहीं ढोबळ गोष्टींचा विचार करूं.

## [ १ ] नामें

**पुल्लिंगी शब्द.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| रम्– (आनंद देणें) | + **अ** | = राम | ( आनंद देणारा ) |
| दह्– ( जळणें ) | + **अ** | = दाह | ( जाळणारा ) |
| कम्– ( इच्छिणें ) | + **अ** | = काम | ( इच्छा ) |
| वद् – ( बोलणें ) | + **अ** | = वाद | ( बोलणें ) |

**स्त्रीलिंगी शब्द.**

| | | | |
|---|---|---|---|
| रम्– ( आनंद देणें ) | + **ति** | = रति | ( आनंद देणारी ) |
| मन्– ( विचार करणें ) | + **ति** | = मति | ( विचार करणारी ) |
| बुध्– ( जाणणें ) | + **ति** | = बुद्धि | ( जाणणारी ) |
| युज्– ( जुळविणें ) | + **ति** | = युक्ति | ( जुळविणारी ) |

**नपुंसकलिंगी शब्द.**

| | | | |
|---|---|---|---|
| मन्– ( विचार करणें ) | + **अन** | = मनन | ( विचार करणें ) |
| वद्– ( बोलणें ) | + **अन** | = वदन | (बोलण्याचें साधन, तोंड) |
| दह्– ( जळणें ) | + **अन** | = दहन | ( जळणें ) |
| चिंत्- ( विचार करणें) | + **अन** | = चिंतन | ( विचार करणें ) |

१. ह्याप्रमाणें कांहीं संस्कृत धातूंना ‘ **अ** ’ प्रत्यय लागून “ **पुल्लिंगी नामें** ” होतात; ‘ **ति** ’ प्रत्यय लागून, “ **स्त्रीलिंगी नामें** ” होतात; व ‘ **अन** ’ प्रत्यय लागून, “ **नपुंसकलिंगी नामें** ” होतात; असें आढळून येतें.

| | |
|---|---|
| स्पृह् + **आ** = स्पृहा | रच् + **अना** = रचना |
| शंक् + **आ** = शंका | याच् + **अना** = याचना |
| क्षुध् + **आ** = क्षुधा | गण् + **अना** = गणना |
| स्पर्ध् + **आ** = स्पर्धा | युज् + **अना** = योजना |

२. याप्रमाणें कांहीं धातूंना '**आ**' किंवा '**अना**' हे प्रत्यय लागून, "**स्त्रीलिंगी नामें**" होतात; असें दिसतें.

## [ २ ] विशेषणें

| | |
|---|---|
| कृ (कर्) + **तृ** (ता) = कर्ता | मुद् ( मोद् ) + **अक** = मोदक |
| भृ (भर्) + **तृ** (ता) = भर्ता | कृ ( कार् ) + **अक** = कारक |
| दा + **तृ** (ता) = दाता | मृ ( मार् ) + **अक** = मारक |
| हु (हो) + **तृ** (ता) = होता | तृ ( तार् ) + **अक** = तारक |
| जि ( जे ) + **तृ** (ता) = जेता | वह् ( वाह् ) + **अक** = वाहक |
| भू ( भव् ) + **इतृ** (ता) = भविता | भिद् ( भेद् ) + **अक** = भेदक |

३. याप्रमाणें '**तृ**' किंवा ('**इतृ**') व '**अक**' हे प्रत्यय लागून, ती क्रिया करणारा अशा अर्थाचीं "**कर्तृवाचक विशेषणें**" बनतात.

| | |
|---|---|
| कृ (कर्) + **य** = कार्य | श्रु (श्राव्) + **य** = श्राव्य |
| त्यज् (त्याज्) + **य** = त्याज्य | दा (दे) + **य** = देय |
| कम् (काम्) + **य** = काम्य | हा (हे) + **य** = हेय |
| मन् ( मान् ) + **य** = मान्य | पा (पे) + **य** = पेय |

---

**सूचना**—या पाठांतील धातूंचे अर्थ व धातूंस होणारे गुण, वृद्धि, इ० फरक, यांविषयीं अधिक समजूत विद्यार्थ्यांनीं शिक्षकांपासून घ्यावी.

| | |
|---|---|
| कृ (कर्)+ **अनीय** = करणीय | कृ (कर्) + **तव्य** =कर्तव्य |
| वंद् + **अनीय** = वंदनीय | भू (भव्) + **इतव्य**=भवितव्य |
| कम् + **अनीय** = कमनीय | भिद् (भेद्) + **तव्य** =भेत्तव्य |
| श्रु (श्रव्) + **अनीय** = श्रवणीय | नी (ने) + **तव्य** =नेतव्य |

४. याप्रमाणें '**य**', '**तव्य**' किंवा ('**इतव्य**') आणि '**अनीय**' हे प्रत्यय कांहीं संस्कृत धातूंस लागून, " तें करण्यास योग्य " ह्या अर्थाचीं "**योग्यार्थक विशेषणें**" होतात; असें आढळून येतें.

| | |
|---|---|
| कृ + **त** = कृत | निंद् + **इत** = निंदित |
| नी + **त** = नीत | सिञ्च् + **इत** = सिंचित |
| मृ + **त** = मृत | पठ् + **इत** = पठित |
| भू + **त** = भूत | भृ + **इत** = भरित |
| शक् + **त** = शक्त | याच् + **इत** = याचित |
| शम् + **त** = शान्त | अर्ज् + **इत** = अर्जित |
| रम् + **त** = रत | भिद् + **त** = भिन्न |
| मन् + **त** = मत | छिद् + **त** = छिन्न . |

५. याप्रमाणें धातूला '**त** किंवा '**इत**' प्रत्यय लागून "**भूतकालवाचक विशेषणें**" होतात.

---

## प्रश्न व गृहपाठ

**१. खालील शब्द कसे बनले आहेत, त्याची अगोदर वर्गांत चर्चा करा व मग ५।५ शब्दांची घटना घरून लिहून आणा.**

**तुलना, पीडा, उक्ति, दृष्टि, कल्पना, भूषण, शोधन, त्वरा, घटना, भक्ति, वृष्टि, सृष्टि; जरा, शिक्षा, स्थान, मान, पालन, दर्शन, चोर, काम, भाग;**

ज्ञाता, जेता, त्राता, धाता, होता, वेत्ता, भेदक, जल्पक, दर्शक, निंदक, शोधक, रक्षक; कष्ट, नष्ट, दृष्ट, हृष्ट, पीत, भीत, जित, मित, हृत, रत, गत, कान्त, दान्त, शान्त, अन्न, भिन्न, दुग्ध, मुग्ध, दग्ध; दार्शित, पूरित, चरित; इष्ट, लब्ध, श्रुत, बोधित, दूषित; भक्ष्य, भोज्य, रम्य, लभ्य, भक्षणीय, वक्तव्य, वर्धनीय, मान्य, अपरिहार्य; जिज्ञासा, पिपासा; इ०.

# १३. प्रत्ययघटित संस्कृत शब्द – २

मागील पाठांत निरनिराळ्या रीतींनें संस्कृत धातूंस प्रत्यय लागून, शब्द कसे बनतात, तें पाहिलें. आतां आणखीही कोणते प्रत्यय धातूंशिवाय इतर संस्कृत शब्दांस लागून, निरनिराळ्या अर्थांचे दुसरे शब्द बनतात, त्याचा अगदीं ढोबळ असा विचार करूं. खालील शब्द पहा—

| अर्थ | प्रत्यय | शब्द |
|---|---|---|
| **६. अपत्यार्थक**– (अमक्याचा मुलगा या अर्थाचे) | अ | पार्थ (पृथेचा मुलगा), सौभद्र (सुभद्रेचा मुलगा), पांडव (पंडूचा मुलगा). |
| | इ | दाशरथि (दशरथाचा मुलगा), वैराटि (विराटाचा मुलगा), मारुति. |
| | एय | गांगेय (गंगेचा मुलगा), कौंतेय (कुंतीचा मुलगा). |

| अर्थ | प्रत्यय | शब्द |
|---|---|---|
| **७. संबंधार्थक–** (अमक्यासंबंधी या अर्थाचे) | अ | सारस (सरस् म्ह० तळें यासंबंधी, कमळ). |
| | इक | कायिक (कायेसंबंधी), धार्मिक (धर्मासंबंधी), मानसिक (मनासंबंधी). |
| | ईय | त्वदीय (तुझ्यासंबंधी), मदीय (माझ्यासंबंधी), अस्मदीय (आमच्यासंबंधी), युष्मदीय (तुमच्यासंबंधी). |
| **८. भावार्थक—** (गुण किंवा धर्म दाखविणारे) | अ | गौरव (गुरुपणा, मोठेपणा), लाघव (लहानपणा). |
| | य | सौंदर्य (सुंदरपणा), क्रौर्य (क्रूरपणा), माधुर्य (मधुरपणा). |
| | ता | मृदुता (मऊपणा), कठोरता (कठोरपणा). |
| | त्व | शूरत्व (शूरपणा), सरलत्व (सरळपणा). |
| **९. युक्तार्थक—** (तें आहे ज्यापाशीं या अर्थाचे) | मत् | श्रीमान् (श्री ज्यापाशीं आहे तो), बुद्धिमान्, श्रीमती. |
| | वत् | गुणवान् (गुण आहे ज्यापाशीं तो) धनवान्, रूपवान्, रूपवती. |
| | इन् | दन्तिन् (दांत आहेत ज्याला तो; दन्ती), हस्तिन् (हाताप्रमाणें सोंड आहे ज्याला तो; हत्ती). |
| | विन् | तेजस्विन् (तेज आहे ज्याला तो; तेजस्वी). |

| अर्थ | प्रत्यय | शब्द |
|---|---|---|
| **१०. आधिक्यार्थक—** | तर | लघुतर ( अधिक लहान ), गुरुतर ( अधिक मोठा ). |
| ( पहिल्या पेक्षां अधिकपणा दाखविणारे ) | तम | लघुतम ( अत्यन्त लहान ), महत्तम ( मोठ्यांत मोठा ). |
| **११. पूर्णार्थक–** ( त्या वस्तूनें भरलेलें या अर्थाचे ) | मय | जलमय (जलपूर्ण ), आनंदमय (आनंदपूर्ण). |
| **१२. साधनार्थक-** ( ती क्रिया करण्याची वस्तु दर्शविणारे ) | अन | नयन ( पाहण्याचें साधन ), चरण ( चालण्याचें साधन), श्रवण (ऐकण्याचें साधन) भवन, वदन. |
| **१३. स्वार्थक–** | क | ( बाल ) बालक, ( दीप ) दीपक. |
| ( मूळचाच अर्थ दर्शविणारे ) | का | (कुमारी)कुमारिका,(चिन्तन) चिन्तनिका, ( दीप ) दीपिका, पूरणिका. |

## प्रश्न व गृहपाठ

१. खालील शब्दांतील मूळचे शब्द किंवा धातु सांगा व त्यांपासून ते शब्द कसे बनले, तें सांगा—

पक्षी, दन्ती, करी, श्रीमान्, बुद्धिमान्, मायिक, धनिक, नाविक, अन्नमय, काष्ठमय, लोहमय, सुखित, तृषित, हर्षित, पल्लवित, कुसुमित,

क्षुधित, चपलत्व, पृथक्त्व, ऋजुता, जाड्य, ब्राह्मण्य, सैनापत्य, गौरव, लाघव, आधिपत्य, स्वास्थ्य, दार्ढ्य, ऐक्य, द्विजत्व, मार्दव, दैनिक, सांसर्गिक, राजकीय, स्वकीय, परकीय, सौर, नाक्षत्र, मार्गशीर्ष, वैदिक, कण्ठ्य, तालव्य, दन्त्य, शालेय, वन्य, ग्राम्य, नागर, दौःशासनि, पौरव, मानव, द्रौणि, जामदग्न्य, कार्तिकेय, कौंतेय, सौमित्र, पार्थ, सौभद्र, दाशरथि, मारुति, कार्ष्णि, वासुदेव, भार्गव, यादव.

---

# १४. मराठी साधित शब्द–१

संस्कृतांत धातूच्या मागें उपसर्ग व पुढें प्रत्यय लागून, निरनिराळ्या प्रकारें शब्द बनतात; व धातूंप्रमाणें इतर **शब्दां**पासूनही दुसरे शब्द, निरनिराळ्या अर्थाचे प्रत्यय वगैरे लागून बनतात; (शत्रु + त्व = शत्रुत्व, सुन्दर + य = सौन्दर्य, याप्रमाणें) हें आपण मागें पाहिलें. तशाच प्रकारें मराठींतही एका शब्दापासून दुसरे शब्द बनतात, असें फार वेळां आढळून येतें. उदाहरणार्थ—

| | | |
|---|---|---|
| माणूस – माणुसकी | पुणें – पुणेंरी | डोकें – डोकावतो |
| फूल – फुलोरा | मेण – मेणकट | फेस – फेसाळला |
| भला – भलेपणा | लहान – लहानगा | लांब – लांबलें |
| लाट – लाटणें | भी – भ्यालेला | बस – बसवितो |

या प्रकारचे शब्द दुसऱ्या शब्दांपासून साधतात, म्हणून यांना "**साधित शब्द**" असें म्हणतात; त्यांच्यासंबंधीं येथें आतां आणखी थोडा विचार करूं.

## [ १ ] नामें

○ १. कर्तृवाचक—( ती क्रिया करणारा या अर्थी )

सोनार   लोहार
माळी   तांबोळी
कथेकरी   वारकरी

[ सोनार = सोन्याचे दागिने करणारा; याप्रमाणें ]

○ २. युक्तार्थक—( त्यानें युक्त या अर्थी )

भाजीवाला   टांगेवाला
पट्टेवाला   मसालेवाला
गुळवणी   ताकवणी
लोणचें   रायतें

[ भाजीवाला = भाजी आहे ज्यापाशीं तो, याप्रमाणें ]

○ ३. स्वार्थक—( मूळचाच अर्थ दा० )

खांबला ( खांब ) ओंडका (ओंडा)
माळका ( माळ ) राखाडी ( राख )
जाचणूक (जाच) छळणूक ( छळ )

[खांबला म्हणजेच खांब; याप्रमाणें]

## [ २ ] विशेषणें

○ १. कर्तृवाचक–( ती क्रिया करणारा या अर्थी )

कृपाळू   दयाळू
चहाडखोर   संशयखोर
दरोडखोर   थट्टेखोर

[ कृपाळू = कृपा करणारा; याप्रमाणें ]

○ २. युक्तार्थक—( त्यानें युक्त या अर्थी )

दुधाळ   केसाळ
मसालेदार   चवदार
रोगट   मेणचट
रेशमी   पितळी

[ दुधाळ = दुधानें युक्त, याप्रमाणें]

*३. स्वार्थक—(मूळचाच अर्थ दा०)

बरवा (बरा) रिकामका(रिकामा)
जोगता(जोगा) कडवा ( कडू )
थोरला (थोर) थोडका( थोडा )

[ बरवा म्हणजेच बरा; याप्रमाणें ]

## नामें

० ४. अल्पत्वार्थक–(लहानपणा दा०)

| | |
|---|---|
| पलंगडी | तबकडी |
| लोटी | गुंडी |
| वाघरूं | वासरूं |

[ पलंगडी = लहान पलंग; याप्रमाणें ]

० ५. सादृश्यार्थक–(सारखेपणा दा०)

| | |
|---|---|
| चांदवा | गऱ्हला |
| चांदकी | फुली |
| चिकी | कानवला |

[ चांदवा = चांद म्हणजे चंद्र यासारखा; याप्रमाणें ]

† ६. धातुसाधित—( धातूवरून बनलेले )

| | |
|---|---|
| करणें | देणें |
| कापणी | मळणी |
| दळण | कांडण |
| कर | डर |
| वेढ | झगडा |
| उडी | बुडी |
| हसूं–हसें | रडूं–रडें |

## विशेषणें

० ४. अल्पत्वार्थक–(लहानपणा दा०)

| | |
|---|---|
| ०शिपुर्डा | ०गोसावडा |
| *म्हातारडा | *भिकारडा |
| *गोजिरवाणा | *बापुडवाणा |

[ शिपुर्डा = शिपायापेक्षां गौण या अर्थी; याप्रमाणें ]

* ५. सादृश्यार्थक–(सारखेपणा दा०)

| | |
|---|---|
| वेडपा | वेडसर |
| हिरवट | उभट |
| लहानसा | मोठासा |
| काळेला | उंचेला |

[वेडपा = वेड्यासारखा; याप्रमाणें]

† ६. धातुसाधित—( धातूवरून बनलेले )

| | |
|---|---|
| हसरा | बोलका |
| रडका | फुटका |
| हसरी | रडवी |
| नाचरें | बसरें |
| भांडाळ | तोंडाळ |
| खर्चीक | सोशीक |
| अडेल | चढेल |

| नामें | | विशेषणें | |
|---|---|---|---|
| ० ७. महत्त्वदर्शक—(मोठेपणा दाख०) | | † ७. भूतकालवाचक—(मागें झालेलें या अर्थाचे ) | |
| पेटारा | भाकरा | मेलेला-ली-लें | केलेला-ली-लें |
| शिंपला | टोपला | पडीत | बुडीत |
| गोपाळराव | मोरोपंत | भरींव | कोरींव |
| नानासाहेब | माईसाहेब | वेचक | कुजकट |
| [ पेटारा = मोठी पेटी; याप्रमाणें ] | | | |
| ० ८. स्थानार्थक—( ठिकाण दाख० ) | | § ८. स्थानार्थक—( ठिकाण दाख० ) | |
| पाणवठा | मसणवटा | वरचा | खालचा |
| गोठण | पायठण | मागला | पुढला |
| घंगाळ | चुनाळ | इकडचा | तिकडचा |
| फिरंगाण | हबसाण | वरील | खालील |
| * उंचवटा | * खोलवटा | आंतील | बाहेरील |
| [ पाणवठा = पाण्याचें ठिकाण ] | | | |
| ९. भावार्थक—( गुण, धर्म, दा० ) | | ० ९. संबंधार्थक—( संबंध दाख० ) | |
| ० मनुष्यपणा | ० देवपण | वाईकर(वाईचा) | पुणेंकर(पुण्याचा) |
| ० माणुसकी | ० पाटिलकी | खेडवळ | नागर |
| * भलाई | * ढिलाई | पुणेरी | सोलापुरी |
| * एकी | * बेकी | पैठणी | नागपुरी |
| * लुच्चेगिरी | * थंडाई | गुलाबी | सुती |
| † वागणूक | † गांजणूक | देशी | कोंकणी |
| † लढाई | † चढाई | सरकारी | इंग्रजी |

## नामें

† १०. अनुकरणवाचक—(ध्वनींवरून बनलेले)

| | |
|---|---|
| कळकळ | मळमळ |
| किरकीर | पिरपीर |
| खटपट | तडफड |
| कलकलाट | गडगडाट |
| कडकडणें | गडगडणें |

११. समुदायार्थक ( समुदाय दा० )

| | |
|---|---|
| आठवडा | पोरवडा |
| म्हारवडा | मेंढवाडा |
| पोरवंडा | पोरवाडा |

[ आठवडा = आठ दिवसांचा समुदाय; याप्रमाणें ]

## विशेषणें

† १०. अनुकरणवाचक—(ध्वनींवरून बनलेले )

| | |
|---|---|
| तरतरीत | भुसभुशीत |
| चमचमीत | झणझणीत |
| खरखरीत | ठणठणीत |
| किरकिऱ्या | लटपट्या |
| बडबड्या | चिरचिऱ्या |

|| ११. रीतिदर्शक व परिमाणदर्शक—

| | | | |
|---|---|---|---|
| (हा) | असा | इतका | एवढा |
| (तो) | तसा | तितका | तेवढा |
| (जो) | जसा | जितका | जेवढा |
| (काय) | कसा | कितका | केवढा |
| (कोण) | कोणता | | |

याप्रमाणें नामसाधित, सर्वनामसाधित, विशेषणसाधित, धातुसाधित व अव्ययसाधित **नामें** व **विशेषणें** आपल्या भाषेंत होतात.

[ वरतीं (०) या खुणेनें **नामसाधित** शब्द, ( * ) या खुणेनें **विशेषणसाधित** शब्द, (†) या खुणेनें **धातुसाधित** शब्द, (||) या खुणेनें **सर्वनामसाधित** शब्द व (§) या खुणेनें **अव्ययसाधित** शब्द दाखविले आहेत; हें सहज ध्यानांत येईल. ]

## प्रश्न व गृहपाठ

१. खालील **नामें** कशा प्रकारें बनलीं आहेत, तें सांगा—

लोहार, सुतार, तेली, कथेकरी, वारकरी, माळी, चितारी, भाजीवाली, मसालेवाला, राखाडी, ओंडका, फसवणूक, पुजारी, मळई, खांबला, चिंधडी, तबकडी, लोटी, मेंढरूं, डबरें, जुडगा, पेटारा, रामजी, गंगूताई, इंदिराबाई, हरिपंत, रामभाऊ, कानवला, आंबवणी, ताकवणी, उन्हाळा, हिंवाळा, तायतळें, दन्ताळें, वाळवंट, तेलंगण, शिलंगण, पुंडावा, सोयरीक, शिपाईगिरी, खुशाली, गारवा, चिकटा, चाळिशी, बत्तिशी, छकडी, पांसरी, भरती, ओहोटी, लावणी, मळणी, देणें, घेणें, मारा, चावा, लढाई, कुचराई, साठा, ठेवा, चाळण, किसणी, खवणी, कलकलाट, कुजबुजाट, दाणादाण.

२. खालील **विशेषणें** कशीं झालीं आहेत, तें सांगा—

मराठी, मिशाळ, चवदार, हवाशीर, रोगट, वातट, किडका, लाकडी, सडका, कष्टाळू, मायाळू, म्हातारडा, बापडा, थोरला, थोडका, लहानसा, वेडसर, पिवळसर, तिरकस, हसरी, तोंडाळ, सोशिक, भरीव, भ्यालेला, पडीत.

---

# १५. मराठी साधित शब्द – २

## [ ३ ] क्रियापदें

१. नामसाधित—

| | |
|---|---|
| फुलला | मळला |
| उद्धारला | उत्तरला |
| उपदेशिला | चितारला |
| माणसाळला | हाताळला |
| फेसाळतो | डोकावतो |
| सुखावतो | खुणावतो |

२. विशेषणसाधित—

| | |
|---|---|
| लांबला | आंखुडला |
| वेडावला | स्थिरावला |
| रोडावला | पिसाळला |
| थंडावला | दुणावला |
| गारठतो | चिकटतो |
| लंगडतो | एकारलें |

यांत पहिल्या ठिकाणीं फूल या नामापासून फुलला, मळ या नामापासून मळला, याप्रमाणें क्रियापदें झालीं आहेत; तसेंच दुसऱ्या ठिकाणीं लांब व आंखूड या विशेषणांपासून लांबला व आंखुडला हीं क्रियापदें झालीं आहेत; व तें आपल्या सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

३. धातुसाधित—(प्रयोजकार्थक)

| | |
|---|---|
| करवितो | हसवितो |
| बसवितो | रडवितो |
| देववितो | घेववितो |
| मारतो | चारतो |
| पाडतो | दाबतो |
| फोडतो | तोडतो |
| आणितो | पाजतो |
| लावतो | दाखवितो |

४. धातुसाधित—(शक्यार्थक)

| | |
|---|---|
| करवतें | बसवतें |
| खाववलें | खाववेल |
| मारवतें | मारवलें |
| देववलें | देववेल |
| तुटतें (तोडवतें) | |
| हालतें (हालवतें) | |
| चावतें (चाववतें) | |
| चाललों (चालूं शकलों) | |

ह्या ठिकाणीं कर या धातूपासून 'करवितो' अशीं दुसऱ्याकडून क्रिया करविणें या अर्थाचीं क्रियापदें झालीं आहेत; आणि दुसरी-कडे कर या धातूपासून 'करवतें' अशा प्रकारें शक्ति किंवा समर्थता असणें या अर्थाचीं क्रियापदें बनलीं आहेत. यांना अनुक्रमें "**प्रयोजक**" व "**शक्य**" क्रियापदें म्हणतात.

५. अव्ययसाधित—

मागें—मागासला, दूर—दुरावला,
खालीं—खालावला, पुढें—पुढारला,

याप्रमाणें अव्ययांपासूनही मराठींत थोडींशीं क्रियापदें साधतात.

## [ ४ ] अव्ययें

१. नामसाधित—

| | | |
|---|---|---|
| सकाळचा | दुपारचा | दुपारला |
| क्षणभर | दिवसभर | मध्यें |
| काठोकाठ | दारोदार | मुळें |
| सालोसाल | दिवसेंदिवस | घरोघर |
| गांवोगांव | रस्तोरस्तीं | गल्लोगल्लीं |

२. विशेषणसाधित—

| | | |
|---|---|---|
| दोनदां | तीनदां | हजारदां |
| एकवार | दुबार | एकवेळ |
| बहुधा | शतधा | वेडेंवाकडें |

३. धातुसाधित—

| | | |
|---|---|---|
| करून | जाऊन | देऊन |
| करितां—करितांना | जातां—जातांना | देतां—देतांना |
| करीत | जात | देत |
| चालू | सुरू | लागू |

४. अव्ययसाधित—

| | | |
|---|---|---|
| मागून | पुढून | वरून |
| येथून | तेथून | कोठून |
| एव्हांपासून | तेव्हांपासून | केव्हांपासून |
| आजला | उद्यांला | येथवर |
| केव्हांतरी | कधींतरी | कोठेंतरी |

| | | |
|---|---|---|
| समोरून | दुरून | बाहेरून |
| वरवर | पुढेंपुढें | खालोखाल |
| मागोमाग | कधींकधीं | समोरासमोर |

याप्रमाणें अव्ययेंही नामें, विशेषणें, धातु व अव्ययें यांपासून मराठींत बनतात.

---

## प्रश्न व गृहपाठ

१. नाम व विशेषण यांपासून बनलेलीं तीन तीन क्रियापदें वाक्यांत योजून दाखवा.

२. धातूंवरून कोणतीं क्रियापदें साधतात ? तीं कोणता निराळा अर्थ दाखवितात ?

३. दोन धातूंचीं **प्रयोजक** व **शक्य** वाक्यें लिहून आणा.

४. अव्ययांपासून क्रियापदें झाल्याचीं दोन उदाहरणें द्या.

५. नामांपासून व विशेषणांपासून अव्ययें झाल्याचीं दोन दोन उदाहरणें द्या.

६. अनुकरणवाचक नामें, विशेषणें व अव्ययें ज्यांत आहेत, अशीं प्रत्येकीं दोन दोन वाक्यें लिहून आणा.

---

# १६. परभाषेंतील शब्द

आपल्या देशांत मुसलमानी राज्य पुष्कळ काळपर्यंत होतें, ह्यामुळें त्यांच्या भाषा ज्या फारसी व आरबी त्यांतील शब्द आपल्या मराठींत पुष्कळच आले आहेत; त्यांपैकीं नेहमीं येणाऱ्या कांहीं शब्दांचा थोडासा विचार करूं.

## [ १ ] फारसी शब्द—नामें

### १. कर्तृवाचक—

**गर**—सौदागर (व्यापारी), कारीगर (कुशलतेचें काम करणारा-कारागीर), जिनगर ( कोष्टी ).

**गार**—गुनाहगार (गुन्हा करणारा-गुन्हेगार), खिदमतगार(चाकरी कर०), मददगार ( मदत करणारा ), कामगार ( काम करणारा), शिकलगार (शस्त्रें साफ कर० ), रोजगार (रोज घालवि० ).

**वान**—बागवान (बाग करणारा), सारवान ( उंट राखणारा).

**बान**—मिहरबान (कृपा कर०, मेहेरबान), हलालखोर (नीतीनें वाग०), हरामखोर (अनीतीनें वागणारा).

**अंदाज**—बरकंदाज ( बंदूक मारणारा ), तीरंदाज ( तीर सोडणारा), गोलंदाज ( गोळा फेकणारा ).

**गीर**—जहांगीर ( जग जिंकणारा ), आलमगीर ( जग जिंक० ).

### २. स्थानार्थक—

**दान**—गुलदान ( फुलपात्र ), कलमदान ( दौत ), शमअदान ( शामदान ), तावदान ( काचपात्र ), पानदान ( पानांची पेटी ).

**स्तान**—हिंदुस्तान ( हिंदु म्हणजे काळ्या मनुष्यांचें स्थान ), अरबस्तान, कबरस्तान ( मसणवटी ).

### ३. अल्पत्वार्थक—

**चा**—बगीचा ( लहान बाग ), घालीचा ( लहान सतरंजी—गालीचा ).

### ४. भाववाचक—

**ई**—नेकी ( खरेपणा ), खूबी (चांगुलपणा, सुंदरपणा—खुबी),
फकिरी ( फकीरपणा ), हमाली ( हमालाचा धंदा),
मजुरी ( मजुराचें वेतन ).

**गी**—बंदगी ( सेवा ), रवानगी ( पाठविणें ).

**गिरी**—सौदागिरी(व्यापारीपणा), गुलामगिरी ( गुलामपणा ).

## फारसी विशेषणें

### ५. युक्तार्थक—

**वर**—जानवर ( प्राण असणारें, जनावर ), जोरवर ( जोरावर ).

**वार**—उमीदवार ( आशायुक्त-उमेदवार ), सोयवार ( सोययुक्त ).

**दार**—चोबदार (काठी बाळगणारा), फौजदार ( फौज बाळगणारा),
पोतदार ( पिशवी बाळगणारा ),
दुकानदार (दुकान असणारा), जमीनदार (जमीन असणारा),
इनामदार (इनाम असणारा ), सुभेदार (सुभा असणारा ),
अर्जदार ( अर्ज करणारा ), जबाबदार ( जबाब देणारा ).

**बंद**—नालबंद ( नाल बांधणारा ), हत्यारबंद (हत्यार बाळग०),
कमरबंद ( कमर बांधणारा).

### ६. लेखकार्थी—

**नवीस**—चिठ्ठीनवीस ( पत्रें लिहिणारा—चिटणीस ),
पोतहनवीस (जमाखर्च लिहिणारा—पोतनीस ),
फडनवीस ( फडाकडील लेखक—फडणीस ),

वाकीअनवीस ( वर्तमानलेखक—वाकनीस ),

कारखाननवीस ( कारखानालेखक—कारखानीस ),

मददनवीस ( मदतलेखक—मदतनीस ).

**७. आधिक्यार्थक—**

**बाज**—इश्कबाज ( स्त्रैण असणारा ), दगलबाज ( दगा करणारा ).

**८. अपत्यार्थक—**

शाहजादा (शहाचा पुत्र ), शाहजादी ( राजपुत्री ), बादशाहजादी.

## [ आणखी कांहीं नामें ]

**९. स्थानार्थक—**

**खाना**-कारखाना, शिकारखाना, दौलतखाना, फरासखाना (आस्तरणस्थान) तोपखाना, हमामखाना (स्नानगृह), किताबखाना ( पुस्तकस्थान ), पीलखाना (हत्ती बांधण्याचें ठिकाण), अजबखाना (वस्तुसंग्रहस्थान), दवाखाना, जवाहिरखाना, शेतखाना ( शुद्धिस्थान ).

**१०. नगरवाचक—**

**आबाद**—औरंगाबाद, दौलताबाद, शिकंदराबाद, हैद्राबाद, अहमदाबाद, फतेआबाद.

**११. लेखपत्रवाचक—**

**नामा**—हुकूमनामा शाहनामा, जाहीरनामा, करारनामा, रोजनामा, मुखत्यारनामा.

मराठींत येणाऱ्या फारसी शब्दांचें सामान्य स्वरूप वरीलप्रमाणें दिसून येतें.

## [ २ ] आरबी शब्द

आरबी धातूंवरून शब्द कसे बनतात, हें पाहणें सोपें व मौजेचें आहे; पण तितक्या खोलांत न शिरतां नमुन्याकरितां थोडेसे शब्द दाखवून पुढें वळूं.

नजर ( पाहणें ). नाजिर (नाझर=पाहणारा) मन्जूर ( मंजूर=पसंत )
शहर (प्रसिद्ध करणें). शाहिर (प्रकाशक) मशहूर (महशूर-प्रसिद्ध)
अशक (इच्छिणें). आशिक (आशुक-आशाळभूत) मअशूक ( माशुक-इष्ट )

याचप्रमाणें आणखी शब्द—

| | | |
|---|---|---|
| मालिक ( मालक ) | घाफिल ( गाफील ) | साहिब ( साहेब ) |
| आमीर ( अमीर ) | मुहस्सील ( महसूल ) | तहस्सील ( तहसील ) |
| मुकद्दम ( मुकादम ) | मुकर्रर ( मुकरर ) | मुसाफिर ( मुशाफर ) |
| मुनासिब ( मुनसब ) | मुवाफिक ( माफक ) | मुबादला ( मोबदला ) |
| इकरार ( करार ) | तफावुत ( तफावत ) | फर्क ( फरक ) |
| अक्ल ( अक्कल ) | कत्ल ( कत्तल ) | फिकर ( फिकीर ) |
| अर्ज ( अर्जे ) | हुक्म ( हुकूम ) | खल्बत ( खलबत ) |
| शर्बत ( सरबत ) | कुसुर ( कसूर ) | शुरूअ ( सुरू ) |
| रुजुआत ( रुजवात ) | शरुआत ( सुरवात ) | |

अशा प्रकारें मराठींत शेंकडों आरबी शब्द येतात, व ते साधारणतः आपल्या परिचयाचेच असतात.

यांशिवाय खालील आरबी शब्द ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत—

इब्न = बीन ( पुत्र ). वलद = पुत्र. कोम = बायको.

उदाहरणार्थ—

रामभट बिन बचंभट = बचंभटाचा मुलगा रामभट.

बाळू वलद भिवा पाटील = भिवा पाटलाचा मुलगा बाळू.

गंगाबाई कोम राजाराम = राजारामाची बायको गंगाबाई.

अशा प्रकारें दरबार, कचेऱ्या, कागदपत्रें, राज्यव्यवस्था, प्रांत, अधिकारी, इ० संबंधाचे हजारों शब्द मुसलमानी राजवटींत आपल्या मराठीमध्यें येऊन 'मराठी'च बनून गेले आहेत. त्यांचें स्वरूप थोडक्यांत ध्यानांत येण्यापुरता येथें अगदींच संक्षिप्त विचार केला आहे. प्राथमिक विद्यार्थ्यांना यापेक्षां खोलांत शिरण्याचें कारण नाहीं.

## [ ३ ] अन्य भाषांतील शब्द

याशिवाय ( १ ) बुक्, टेबल, रेल्वे, स्टेशन, फ्लॅटफॉर्म, तिकीट, कलेक्टर, हेडमास्तर, जज्ज, कान्स्टेबल, कार्ड, पाकीट, गव्हर्नर, पोलिस, पोस्ट, रजिस्टर, कोट, बिस्किट, राकेल, इ० शेंकडों **इंग्लिश** शब्द इंग्रजी राज्यामुळें आपल्या मराठींत आले आहेत, व येत आहेत; तसेंच ( २ ) अक्का, अण्णा, कडबोळें, कडबू, आडकित्ता, उडीद, मूग, बंडी, कुडतें, इ० पुष्कळ **कानडी** शब्द मराठींत आहेत; ( ३ ) चावी, बुतांव, फाणस, बटाटा, हापूस, पायरी, फर्नांडीज, इ० **पोर्तुगीज** शब्दही मराठींत आहेत; ( ४ ) बेटा, बेटी, भाई, रजई, जवारी, 'दसकी लकडी एकका बोजा', गधडा, चपरासी, इ० **हिंदी** शब्द व म्हणी आहेत; आणि ( ५ ) वे, 'जेनुं काम तेनुं थाय', इ० **गुजराती** शब्द व म्हणी मराठी भाषेंत आहेत. सामान्यतः सध्यां आपल्या एवढें ध्यानांत आलें म्हणजे पुरे.

# ३

# छन्दःशास्त्र

## १७. प्रास्ताविक

[ १ ]

क.] गाइ घरा आल्या ।
घण घण घण्टानाद ॥
कुणीकडे घालूं साद ।
गोविन्दा रे १.

गाइ घरा आल्या ।
वासरें हंबरती ॥
कुणीकडे बालमूर्ती ।
कृष्ण माझा २.

गाई घरा आल्या ।
पाडसांस हुंगीतात ॥
माझा मात्र यदूनाथ ।
दुरावला ३.

गाइ घरा आल्या ।
दूधवाटी राहीयेली ॥
कुणीं माझा 'वनमाली' ।
गुन्तवीला ? ४.

—( प्रो० वा० गो० मायदेव )

ह्या **ओव्या** आहेत हें आपल्या सहज ध्यानांत येईल. ह्या रचनेंत कोणत्या कोणत्या गोष्टी आपल्यास आढळून येत आहेत, तें नीट लक्षपूर्वक पहा बरें.

| | |
|---|---|
| १. ह्या प्रत्येक ओवींत चार चरण आहेत. | १. हें म्हणण्यांत कांहीं नाद आहे; तें गुणगुणावेंसें वाटतें. |
| २. दुसरा व तिसरा हे चरण सारखे आहेत. | २. त्या गुणगुणण्यानें मनाला आनन्द होतो; बरें वाटतें. |
| ३. दुसऱ्या व तिसऱ्या चरणाच्या शेवटीं सारखीं अक्षरें आहेत. | ३. यांत प्रत्येक चरणाच्या शेवटीं एक प्रकारचा ठसका वाटतो. |
| ४. शेवटचा चरण आखूड आहे. | ४. शेवटीं झटकन आंखडल्यानें औत्सुक्य द्विगुणित होतें. |

ही कविता वाचून, गुणगुणून, आपल्याला आनन्द कां होतो ? आपलें औत्सुक्य कां वाढतें ? ती कविता किंवा ह्या ओव्या गुणगुणाव्याशा कां वाटतात ? अर्थात् त्यांच्या रचनेमध्यें कांहीं वैशिष्टय आहे, कांहीं ठराविकपणा आहे, कांहीं नाद आहे, कांहीं ठसका किंवा ठेका आहे, कांहीं ठिकाणच्या अक्षरांचा सारखेपणा आहे, कांहीं ठिकाणीं आंखडल्यासारखें वाटतें पण तेंच औत्सुक्य वाढविण्याला कारणीभूत होतें, असा प्रकार आहे.

ह्यावरून असें दिसतें कीं, पद्यामध्यें हा जो कांहीं एक प्रकारचा ठराविकपणा असतो, तो सर्वांना आल्हाददायक वाटत असल्यामुळें, कवींनीं निरनिराळ्या ठराविक आनन्ददायक प्रकारांत काव्यरचना केली असावी.

ख.] ज्यांस आपण सामान्यतः श्लोक असें म्हणतों, त्यांतही वरच्यासारखाच पुष्कळांशीं ठराविकपणा आपल्यास आढळून येतो: कसा तो पहा—

वनीं राजहंसीं, पिकांनीं, शुकांनीं, । ध्वनी गोड तो आयकोनी सुकानीं ॥
त्वरें येउनी सेवियेलें हरीतें । महापापही नाम ज्याचें हरीतें ॥

वरीलप्रमाणेंच ह्या ठिकाणींही चार चरण, शेवटीं व मध्यें सारखीं अक्षरें, ऱ्हस्व-दीर्घ-नियमबद्ध अक्षरक्रम आहे; आणि येथेंही नाद, ठेका, इत्यादि गोष्टी असून, त्यांच्या योगें मनाला मजा वाटते.

ह्याप्रमाणें वरच्या व ह्या दोन्ही पद्यांचें सामान्य स्वरूप एकच आहे, असें म्हणतां येईल. परन्तु पहिली '**ओवी**' किंवा तशा प्रकारची रचना ही अगदीं आपली मराठीची मूळची रचना आहे; आणि दुसरी '**श्लोक**'युक्त किंवा तशा प्रकारची रचना ही आपली मूळची नसून, संस्कृतापासून आपण ती उचलली आहे; हें थोड्या विचारान्तीं आपल्या ध्यानांत येईल.

आपण ह्यांपैकीं एकेका प्रकारच्या रचनेंतील कांहीं ढोबळ छन्दां-संबंधीं येथें थोडासा विचार करूं.

[ २ ]

| | |
|---|---|
| अ इ उ ऋ ऌ | हे स्वर व हे स्वर मिळून झालेलीं अक्षरें **ऱ्हस्व** आहेत. |

त्यांच्या उच्चाराला जेवढा वेळ लागतो, त्याला "**मात्रा**" असें म्हणतात. ऱ्हस्व अक्षराची **एक मात्रा** समजतात.

| | |
|---|---|
| आ ई ऊ ॠ<br>ए ऐ ओ औ | हे स्वर व हे स्वर मिळून झालेलीं अक्षरें **दीर्घ** आहेत. ह्यांच्या उच्चाराला ऱ्हस्वाच्या मानानें |

ज्यास्त—दुप्पट—वेळ लागतो; हें आपण उच्चार करून पाहिल्यास सहज ध्यानांत येईल. ह्यामुळें ह्या दीर्घ अक्षरांच्या **दोन मात्रा** मानितात.

| | | |
|---|---|---|
| सुंदर | किंवा | सुन्दर |
| रंग | किंवा | रङ्ग |
| पंडित | किंवा | पण्डित |
| तसेंच— | | |
| दु:संगति | किंवा | दुस्संगति |
| दु:शासन | किंवा | दुश्शासन |
| नि:शब्द | किंवा | निर्विकार |

येथें ऱ्हस्व अक्षरापुढें **अनुस्वार, विसर्ग** किंवा **जोडाक्षर** आलेलें दिसत आहे; व त्यामुळें त्याच्या मागल्या ऱ्हस्व अक्षरावर उच्चारतांना जोर आलेला आपल्यास कळत आहे. अशा प्रकारें पुढील अनुस्वार, विसर्ग किंवा जोडाक्षर यांमुळें मागील ऱ्हस्व अक्षरावर जेव्हां जोर येतो, तेव्हां त्या मागील ऱ्हस्व अक्षराच्याही **दोन मात्रा** समजतात.

एक मात्रेच्या अक्षराला "**लघु**" व दोन मात्रांच्या अक्षराला "**गुरु**" असेंही म्हणतात. जर पुढें अनुस्वार, विसर्ग किंवा जोडाक्षर असूनही एकाद्या अक्षरावर उच्चारतांना जोर येत नसेल, किंवा तें दोन मात्रांइतकें लांबट म्हटलें जात नसेल, तर त्याच्या दोन मात्रा समजावयाच्या नाहींत; किंवा एकादें ऱ्हस्व अक्षर असूनही तें लांबट उच्चारलें जात असेल, तर त्याच्या दोन मात्रा समजावयाच्या; हें नीट ध्यानांत ठेवावयास हवें.

"माणसें **अ**म्ही सर्व लेंकरें"
"गन्ध**र्व** म्हणे होता०"
"रामीरामदा**स** म्हणे"

येथें ठळक अक्षरांवर उच्चारतांना जोर येत नाहीं, म्हणून त्यांच्या दोन मात्रा नाहींत.

"झणीं धरिलेंसें रूप अमं**गळ**"
"मुनी सांगे मी क्षुधित असें **अ**ती"
"पान्थास देईन जलास चां**ग**
तृषा पशूंची निरसीन सां**ग**"

येथें ठळक अक्षरें उच्चारण्यांत लांबट अशीं येतात; लांबट म्हटल्याशिवाय पद्याची चाल जमत नाहीं; म्हणून त्या ऱ्हस्व अक्षरांच्याही दोन मात्राच आहेत, हें विसरतां उपयोगी नाहीं.

आपल्यास वर दिसून आल्याप्रमाणें पद्यरचनेला ज्यापेक्षां अनेक प्रकारच्या नियमांची, ठेक्यांची, नादांची, जरूरी आहे; त्यापेक्षां त्या गोष्टी ध्यानांत येण्यासाठीं ही अक्षरांच्या ऱ्हस्व-दीर्घसंबंधाची व मात्रांच्या संबंधाची माहिती कळणें अवश्य आहे; म्हणून तिचा आपण येथें कामापुरता सामान्य विचार केला.

---

## प्रश्न व गृहपाठ

१. पद्यामध्यें रचनेच्या दृष्टीनें विशेषतः कोणत्या गोष्टी आढळतात ?

२. ऱ्हस्व अक्षराला गुरुत्व केव्हां येतें ? त्यास कांहीं अपवाद आहेत का ? उदाहरणासहित सांगा.

३. खालील चरणांत गुरुत्व कोठें व कां आलें आहे, तें सांगा—

"विद्यासमन्वितहि दुष्ट परी त्यजावा"

"वृत्तान्त सांगे भरतासि माय । स्वानंद जीचा त्रिजगीं न माय ॥"

४. ऱ्हस्व अक्षर असून, त्यावर जोर नसतांही केवळ दीर्घ–लांबट–उच्चारामुळें त्याच्या दोन मात्रा धराव्या लागतात; अशीं १।२ उदाहरणें द्या.

---

# १८. मराठी वृत्तें

[ १ ]

आपल्या साध्या बोलण्यांत म्हणजे गद्यांत अक्षरांच्या संख्येसंबंधाचा किंवा लघु-गुरु-समुच्चयासंबंधाचा कांहीं नियम नसतो; परन्तु जेव्हां ठराविक प्रकारच्या अक्षरसमुदायासंबंधाचा किंवा ठराविक लघु-गुरु-समुच्चयासंबंधाचा कांहीं नियम असतो, तेव्हां त्या रचनेला "**पद्य**" असें म्हणतात. पद्यांत बहुधा चार पाद किंवा चरण असतात, म्हणूनच त्याला "**पद्य**" म्हणण्याची रीत पडली असावी. ह्या नियमित अक्षरसमुदायासंबंधीं आणि त्यांच्या संख्येसंबंधीं येथें विचार करणें पुढच्या समजुतीकरितां अवश्य असल्यानें, तें काम आतां प्रथम करूं.

[ क ] लघु व गुरु अक्षरें दाखविण्यासाठीं सामान्यतः अक्षरांवर अनुक्रमें ( ‿ ) लघु व ( – ) गुरु ह्या खुणा योजितात.

[ ख ] तीन अक्षरांचा एक गट किंवा समुदाय याला "**गण**" असें म्हणतात. हे अक्षरांचे गण **य, र, त, न; भ, ज, स, म;** असे आठ आहेत. त्यांची समजूत "**वृत्तदर्पणांत**" खालीलप्रमाणें आहे; व तीच रचना सर्वपरिचित असल्यामुळें येथें घेतली आहे.

| | |
|---|---|
| **य** = ( पहिलें लघु ) **यमाचा** | **भ** = ( पहिलें गुरु ) **भा**स्कर |
| **र** = ( मधलें लघु ) रा**धि**का | **ज** = ( मधलें गुरु ) ज**नां**स |
| **त** = ( शेवटचें लघु ) तारां**स** | **स** = ( शेवटचें गुरु ) सम**रा** |
| **न** = ( तिन्ही लघु ) **नमन** | **म** = ( तिन्ही गुरु ) **मानावा** |

एवढ्यावरून आपल्याला नियमित अक्षरसंख्यात्मक वृत्तांसंबंधीं विचार करितां येईल.

नियमित मात्रावृत्तांसंबंधीं विचार करितांना लघु-गुरु अक्षरें नीट ओळखून, मात्रांची संख्या बरोबर मोजतां आली म्हणजे झालें. इतर गोष्टींची फारशी जरूर लागत नाहीं.

## [ २ ]

मराठींत अगदीं प्रथम साधी अशी पद्यरचना फार झाली. ह्यामुळें निव्वळ मराठी अशीं वृत्तें ( १ ) ओवी, ( २ ) अभंग, ( ३ ) दिंडी, ( ४ ) साकी व ( ५ ) आर्या अथवा गीति ( संस्कृतांतून आलेली ) हीं आहेत. नंतर मात्रा व चाली ह्यांच्या फरकामुळें त्यांच्या जातीचा म्हणजे छंदांचा आतां अवाढव्य विस्तार झालेला आहे. आपण येथें सध्यां वरील मुख्य वृत्तांचाच विचार करूं.

### १. ओवी

[क] जो सर्वां भूतांचे ठायीं ।
द्वेषातें नेणेंचि कांहीं ॥
आप-परू जया नाहीं ।
चैतन्या जैसें १
उत्तमातें धरिजे ।
अधमातें अव्हेरिजे ॥
हें कांहींच नेणिजे ।
वसुधा जेंवि २
—( ज्ञानेश्वर )

[ख] पडतां वानरांचें अनुमोदन
स्वयें पुसे रघुनंदन ॥
शिष्ट पाठवावा कोण ? ।
तें निवडोन, सांगा मज १
शिष्ट नसावा महा-भ्याड ।
शिष्टें न धरावी भीड ॥
शिष्ट बोलका सुघड ।
निवाड प्रौढ, निजबुद्धी २
—( एकनाथ )

[क] या ओवींत सामान्यतः पहिल्या तीन चरणांत बहुधा ८ अक्षरें असतात; क्वचित् एक-दोन कमीही असतात. चौथा चरण तोकडा— सामान्यतः चार अक्षरांचा; केव्हां एकाद्या कमी-अधिक अक्षरांचाही असतो. दुसऱ्या ओवींतल्यापेक्षां ही ओवी लहान दिसते. यांत चौथ्या चरणांत बहुधा यमक नसतें.

[ख] या ओवींत प्रत्येक चरणांत बरींच जास्त व अनियमित अक्षरें असतात; चरण मोठाला म्हणून ह्या ओवीस मोठी— लांबट ओवी — असेंही म्हणतां येईल. पहिले तीन चरण व शेवटचा अर्धा चरण यांचे अन्तीं यमक असतें. ह्या ओवींत अक्षरांचा धरबंधच नाहीं म्हटल्यास चालेल.

याप्रमाणें ओवीचे लहान व मोठी असे दोन प्रकार आढळतात; अक्षरें अनियमित यांमुळें गणही अनियमित. यमक मात्र तीन, साडे-तीन किंवा चारही चरणांत आढळतें. ( लहान ओवी विशेषतः **ज्ञानेश्वरांची** व मोठी ओवी **एकनाथादिकांची** असते. )

## २. अभंग

[ क ] खरें बोले जरी । फुका देव जोडे तरी ॥ १ ॥
ऐसे फुकाचे उपाय । सांडुनियां वायां जाय ॥ २ ॥

[ ख ] ब्रह्मरस घेई काढा । तेणें पीडा, वारेल ॥ १ ॥
पथ्य नाम विठोबाचें । आणिक वाचे, न सेवीं ॥ २ ॥

यांतील पहिल्या दोन अभंगांत दोनच चरण आहेत; व त्यांचे शेवटीं यमक आहे. दुसऱ्या दोन अभंगांतही दोनच चरण आहेत; पण त्यांत यमक पहिल्या चरणाचे शेवटीं व दुसऱ्या चरणाचे मध्यें आहे.

आतां खालील अभंग पहा—

[ ग ] मृगाचिये अंगीं । कस्तुरीचा वास ।
असे ज्याचा त्यास । नसे ठावा ॥ १ ॥
भाग्यवंत घेती । वेचुनियां मोलें ।
भारवाही मेले । वाहतां ओझें ॥ २ ॥

[ घ ] अन्तरीं निर्मळ । वाचेचा रसाळ ।
त्याचे गळां माळ । असो नसो ॥ ३ ॥

यामध्यें पहिल्या दोन अभंगांत चार चरण आहेत; पण दुसऱ्याचे व तिसऱ्याचे शेवटीं यमक आहे. तिसऱ्या अभंगांत तिन्ही चरणांचे अन्तीं यमक आहे, एवढाच फरक आहे.

. याप्रमाणें अभंगाचे लहान दोन चरणी अभंग व मोठा चार चरणी अभंग असे मुख्य दोन प्रकार आढळतात.

## ३. दिंडी

तया कासारीं राजहंस पाहे । राजहंसांचा कळप पोहताहे ॥
तयांसाठीं हे, वापिकाच पोहे । नळें केली हें कोण म्हणे नोहे ? १
कथा बोलूं हे मधुर सुधाधारा । होय शृंगारा करुणरसा थारा ॥
निषधराजा नळ नामधेय होता । वीरसेनाचा तनय महा-होता ॥२॥

—( रघुनाथपंडित )

( १ ) अक्षरें अनियमित; ( २ ) चरण चार; ( ३ ) १।२ किंवा ३।४ किंवा सर्व सयमक; ( ४ ) मात्रा नियमित, १९; ( ५ ) नवव्या मात्रेपुढें विराम ( यति ); ( ६ ) म्हणून चरणाचे भाग २;

(७) प्रथम भाग ३ मात्रा व ६ मात्रांचे; (८) दुसरा भाग ६ मात्रा व शेवटीं २ गुरु यांचा; याप्रमाणें गोष्टी दिंडीमध्यें आढळून येतात.

## ४. साकी

हरिचा सखा सुदामा ब्राह्मण, निःस्पृह आत्मज्ञानी ।
होता गृहीं यदृच्छालाभें, परम सुखातें मानी ॥ १ ॥
परि तद्भार्या म्हणे तयाला, द्वारावतिला जावें ।
देइल कांहीं दयाळु तो प्रभु,. त्याला अवलोकावें ॥ २ ॥

यांत (१) चरण चार व अर्धें दोन आहेत; (२) दोन व चार या चरणांचे शेवटीं यमक आहे; (३) पहिल्या व तिसऱ्या चरणांत मात्रा १६ व दुसऱ्या व चवथ्या चरणांत १२ असतात; (४) यति पादान्तीं असतो; (५) चार चार मात्रांचा गट स्वतंत्र मोजतां यावा लागतो; (६) शेवटीं एक गुरु अक्षर; याप्रमाणें गोष्टी आढळतात.

## ५. आर्या (गीति)

स्ववधोद्यतार्जुनातें, कर्ण म्हणे बळ तुझें अनंत रहा– ।
स्वस्थ; मुहूर्तभरि रण-श्रद्धा पुरवील गा अनंतर हा ॥ १ ॥
रथ-चक्र उद्धरूं दे, श्रुति-शास्त्रज्ञा, महारथा, कुलजा, ।
साधु न हाणिति अरिला, पाहति अधृतायुध व्यथाकुल ज्या ॥ २ ॥

मराठींत पुष्कळ वेळां जिला "**आर्या**" असें म्हणतात, ती खरोखर 'गीति' आहे; म्हणून तिचीं उदाहरणें येथें दिलीं आहेत. विद्यार्थ्यांच्या पुस्तकांत मूळची 'आर्या' बहुतेक येतच नाहीं, म्हटलें तरी चालेल; म्हणून हल्लीं जिला "**आर्या**" असें म्हणण्याची रूढि पडली आहे, तिचें म्हणजे गीतीचें लक्षण आपल्यास विशेषतः

ठाऊक हवें. अशा आर्येत पहिल्या व तिसऱ्या चरणांत १२ आणि दुसऱ्या व चौथ्या चरणांत १८ मात्रा असतात. मराठींत फारशा न येणाऱ्या मूळ आर्येचा येथें विचार करण्याचें कारण नाहीं.

---

## १९. संस्कृतांतून आलेलीं वृत्तें

मागील पाठांत निव्वळ आपल्या मराठींतील मात्रावृत्तांचा तेवढा विचार केला. त्या वृत्तांमध्यें अक्षरांच्या नियमितपणापेक्षां मात्रांचा नियमितपणा ज्यास्त होता. आतां विशेषतः अक्षरांच्याच नियमित-पणामुळें व त्यांच्या भिन्नसंख्येमुळें उत्पन्न होणाऱ्या व संस्कृतांतून आपल्या मराठींत आपण घेतलेल्या वृत्तांचा म्हणजे अक्षरवृत्तांचा थोडासा विचार करूं.

### १. अनुष्टुप्

केलें पात्र सुवर्णाचें, कीं विरूपशि खापरी ।
लावितां तेथ संहारी, तम दीपशिखा परी ॥

अक्षरें—८.
गण—अनियमित.
यति—पादान्तीं.

### २. इन्द्रवज्रा

— — ∪ — — ∪ ∪ — ∪ — —
वाल्मीकिविप्रोत्तम-काव्यपद्म । श्रीरामलीला-मकरंदसद्म ॥
तेथें मयूरेश्वर भृंग झाला । सेवावया नित्य सुखें रसाला ॥

अक्षरें—११.
गण—त, त, ज, गु, गु.
यति—पादान्तीं.

## ३. उपेन्द्रवज्रा

तया वनीं एक तटाक तोयें । तुडुंबलें तामरसानपायें ॥
निरंतरामंद मरंद वाहे । तपांतही यास्तव रिक्त नोहे ॥

अक्षरें—११. | यति—पादान्तीं.
गण—ज, त, ज, गु, गु.

## ४. भुजंगप्रयात

करूं ये समाधान जो मूर्ख त्याचें । धरूं ये सुखें चित्त पै जाणत्याचें ॥
न जाणे न नेणे अशा पामराला । बुझावूं शकेना विधाता तयाला ॥

अक्षरें—१२. | यति—पादान्तीं.
गण—य, य, य, य.

## ५. द्रुतविलंबित

भरत शोक अनेक तिचे असे । परिसतां मग बोलत तो असे ॥
जननि गोष्टि समस्तहि हे खरी । परिस ये विषयीं मम वैखरी ॥

अक्षरें—१२. | यति—पादान्तीं.
गण—न, भ, भ, र.

## ६. वसंततिलका

हे देवि, ऐहिक सुखें मिळती जनांला ।
जीं कां तुझ्याकडुनि त्यांविषयीं तयांला ॥

गंगे, विशुद्ध उपकार तुझे मनांत ।
मानावयासचि खरोखर पाहिजेत ॥ १ ॥

अक्षरें—१४. | यति—चरणाचे शेवटीं.
गण—त, भ, ज, ज, ग, ग.

## ७. मालिनी

कलकल कलहंसें फार केला सुटाया ।
फडफड निजपक्षीं दाविलें कीं उडाया ॥
नृपतिस मणिबन्धीं टोंचिता होय चंचू ।
धरि सुदृढ जया त्या काय सोडील पंचू ? ॥

अक्षरें—१५. | यति—८, ७, या अक्षरांपुढें.
गण—न, न, म, य, य.

## ८. मन्दाक्रांता

श्रीवाल्मीकिप्रभृति मुनिहीं वर्णिली रामलीला ।
मादृक्षांहीं मुदित-हृदयें काय गावें न तीला ? ॥
श्रीकण्ठेन्द्राद्यमरपरिषत्सेव्य गंगाप्रवाहीं ।
सन्ध्या-स्नानादिक न करणें काय या मानवांहीं ? ॥

अक्षरें—१७. | यति—४, ६, ७, या अक्षरांचे शेवटीं.
गण—म, भ, न, त, त, ग, ग.

## ९. शिखरिणी

कृतीचीं आयाळें जडवुनि गळा पुष्ट करुनी ।
वसे श्वा सिंहाच्या पदिं बहुत आवेश धरुनी ॥

तरी जो ऐकोनी भिउनि पळती मत्तहि करी ।
कसा त्या नादातें क्षणभरिहि तो पामर करी ? ॥

अक्षरें—१७.
गण—य, म, न, स, भ, ल, गु.
यति—६, ११, या अक्षरांचे शेवटीं.

## १०. हरिणी

क्षणहि तुमची देवा सेवा नसे घडली मला ।
मलिन बहु मी झालों त्यालों अघांबुधिच्या मला ॥
परि न नरकीं रंका टाका सदा ममता धरा ।
शरण नर जो आला त्याला प्रभू तुम्हि उद्धरा ॥

अक्षरें—१७.
गण—न, स, म, र, स, ल, गु.
यति—६, ४, ७, या अक्षरांचे शेवटीं.

## ११. पृथ्वी

धना परिजनां घरीं तुमचिया उणें कायसें ? ।
न लाभ मणि–हेम–भूपतिस जोडिल्या आयसें ॥
परि प्रभुहि संग्रहीं सकल वस्तुला ठेविती ।
गुणा न म्हणतां उणा अधिक आदरें सेविती ॥

अक्षरें—१७.
गण—ज, स, ज, स, य, ल, गु.
यति—८ व ९ चे अंतीं.

## १२. शार्दूलविक्रीडित

ज्याचे पल्लव मंगलप्रद शिणा छाया जयाची हरी ।
गंधेंयुक्त फुलें फलेंहि दिसती ज्याचीं सुधेच्या परी ॥

वाटे जो रमणीय भूषण वनश्रीच्या मुखींचें भला ।
आम्रा त्या पिक सेवितां समसमां संयोग कीं जाहला ! ॥

अक्षरें—१९.
गण—म, स, ज, स, त, त, गु.
यति—१२ व ७ चे अन्तीं.

## १३. स्रग्धरा

जीं भूतें पांच केलीं अनल, जल, धरा, वायु, आकाश, ईशें ।
यत्संयोगेंच सारें नयनविषय हें सृष्ट विश्व प्रकाशे ॥
ज्यांच्या योगेंच येती बहुसुख ऋतु हे त्यांस मी प्रार्थितों हें ।
सर्वस्थित्यंतरीं हो प्रभुकवन करा विस्मरा त्या न मोहें ॥ १ ॥

अक्षरें—२१.
गण—म, र, भ, न, य, य, य.
यति—७, ७, ७, चे अन्तीं.

आणखी पुष्कळच अशा प्रकारचीं म्हणजे संस्कृतांतून आलेलीं श्लोकात्मक वृत्तें मराठींत आहेत; परन्तु आपल्यास वारंवार येणाऱ्या वरील प्रमुख वृत्तांचाच मात्र येथें विचार केला आहे.

[यांशिवाय कटाव, फटके, लावण्या, राजहंस, आनन्दकन्द किंवा गझल, सुनीत, इ० रागदारीचे व अन्य प्रकारचे पुष्कळ छन्द मराठींत आहेत व नवे नवे येऊन रूढ होत आहेत. त्यांच्या गाण्यानें व श्रवणानें मन प्रसन्नही होतें; परन्तु विद्यार्थ्यांना त्या बाबतींत असेंच तृषित ठेवणें तूर्त भाग आहे. ]

## प्रश्न व गृहपाठ

१. निव्वळ मराठी वृत्तें कोणतीं ?

२. **आर्येचें** ( गीतीचें ) लक्षण सांगा.

३. **गण व यति** म्हणजे काय ?

४. खालील चरणांचे गण पाडून, वृत्त कोणतें तें सांगा—

( १ ) करूं ये समाधान जो मूर्ख त्याचें । ( २ ) निंदोत वानोत सुनीतिमंत । ( ३ ) हा लाभ पूर्वसुकृताविण काय होतो ? । ( ४ ) आम्रा त्या पिक सेवितां समसमां संयोग कीं जाहला । ( ५ ) नवस करिती पुत्रासाठीं कितीक जगीं स्त्रिया । ( ६ ) परंतू मूर्खाचें हृदय धरवेना क्षणभरी । ( ७ ) संपत्काळीं कोवळें सज्जनांचें। ( ८ ) ते आणितात निजनाथ महोत्सवानें। ( ९ ) श्रीमदुपाध्यायोत्तम कविवर केशव-गणेश-पादरजा । (१०) हीनशक्ति रिपु त्याशीं संधी करितिल कैसे राजे ? । (११) वरालें गंगेनें तंव विषम-वैधव्य महिनें । (१२) वाल्मीकिविप्रोत्तम-काव्यपद्म । (१३) केलें पात्र सुवर्णाचें, कीं विरूपशि खापरी । (१४) हा हा देवी हृदय फुटतें देह माझा गळाला । (१५) रामें लोकाभिरामें मदनशतसमें पूर्णकल्याणधामें । (१६) हलु हलु अमलांगी गोरटी राजबाळी ।

# ४

# अलङ्कार

## २०. भाषाभूषणें

[ १ ]

एकच गोष्ट मनुष्याला सांगावयाची असते; पण ती तो आपापल्यापरी किती निरनिराळ्या रीतींनीं सांगूं शकतो, तें पहा—

१. "रामशास्त्री जमदग्नीप्रमाणें रागीट आहेत."

(येथें रामशास्त्र्यांचें जमदग्नीशीं कोपिष्ट स्वभावाचे दृष्टीनें **साम्य** वर्णिलें आहे.)

२. "रामशास्त्री जमदग्निच आहेत."

(येथें रामशास्त्र्यांनाच जमदग्नि म्हणून त्यांचा **अभेद** किंवा ऐक्य वर्णिलें आहे.)

१. "सीतेचें मुख चन्द्राप्रमाणें सुन्दर आहे."

(येथें मुखाचें चन्द्राशीं सौंदर्याच्या दृष्टीनें **साम्य** वर्णिलें आहे.)

२. "राम सभेंत येतांच सीतेचा मुखचंद्र प्रफुल्लित झाला."

(येथें मुखालाच चंद्र म्हणून त्यांचा **अभेद** किंवा ऐक्य वर्णिलें आहे.)

| | |
|---|---|
| ३. "रमण्यांत रामशास्त्री **जणुं काय** जमदग्निच भासले!" | ३. "सीतेचें मुख म्हणजे **जणुं कांहीं** आकाशांतला चन्द्रच जमिनीवर अवतरला आहे, असें वाटतें!" |
| (येथें रामशास्त्री जमदग्निच वाटतात, अशी 'जणुं काय' हे शब्द योजून, कल्पना केली आहे.) | (येथें मुख हें चन्द्रच भासतें, अशी 'जणुं कांहीं' या शब्दांची योजना करून, कल्पना केली आहे.) |
| ४. "अहो, ते रामशास्त्री नव्हेत; जमदग्निच आहेत!" | ४. "तें मुख नाहीं, तर तो चंद्रच आहे!" |
| (येथें रामशास्त्री खरे असून, त्यांवर ते जमदग्नि असल्याचा आरोप केला आहे.) | (येथें खरें मुखच असून, त्यावर तो चन्द्र असल्याचा आरोप केला आहे.) |
| ५. "रामशास्त्री सदा असेच; दुर्वास कधीं शांत आढळले आहेत काय?" | ५. "सीतेचें मुख नेहमींच आनंद-दायक; चंद्र सर्वांना आल्हा-दकच असावयाचा." |
| (येथें रामशास्त्री कसे आहेत हें दुर्वासाचें उदाहरण किंवा दाखला देऊन, ती गोष्ट सूचित केली आहे.) | (येथेंही चंद्र आल्हादक असतो; हें उदाहरण किंवा दाखला देऊन, सीतेचें मुखही तसेंच आल्हादक असतें; असें सूचित केलें आहे.) |

६. "अतिक्रोधी काय न करील? जमदग्नीनें पत्नीलाही ठार मारविलें!"

(येथें जमदग्नीच्या विशेष उदाहरणावरून कोपिष्ट मनुष्याबद्दलच्या सामान्य सिद्धान्ताचें समर्थन केलें आहे.)

६. "सौंदर्य केव्हांही आल्हादकच; चंद्राला 'आल्हाद दे' असें कोणी सांगायला गेला आहे का?"

(येथेंही चंद्राच्या विशेष उदाहरणावरून सुन्दर पदार्थ नेहमीं आल्हादकच असतो; या सिद्धान्ताचें समर्थन केलें आहे.)

याप्रमाणें "रामशास्त्री रागीट होते" व "सीता फार सुन्दर होती" एवढीच गोष्ट सांगावयाची असतां, ती वर दिल्याइतक्या प्रकारांनीं सांगितली आहे. "रामशास्त्री रागीट होते" व "सीता सुन्दर होती" ह्या साध्या वाक्यांपेक्षां बोलणाराला व ऐकणाराला तोच अर्थ दर्शविणारीं वरील वाक्यें ज्यास्त मजेदार अशीं वाटतात. म्हणजे साध्या बोलण्यापेक्षां केव्हां सादृश्य दाखवून, केव्हां उदाहरण देऊन, केव्हां आभास उत्पन्न करून, केव्हां आडपडद्यानें, अशा निरनिराळ्या रीतींनीं बोलण्याचा मनुष्यस्वभावच आहे. अर्थात् ह्या अर्थाच्या दृष्टीनें मजा वाटणाऱ्या किंवा बोलण्यांतील शोभेच्या गोष्टीही कांहीं मर्यादेपर्यंत मनुष्याला आवडणाऱ्या आहेत, असें म्हणतां येईल.

## [ २ ]

अर्थाच्या चमत्कृतीनें ज्याप्रमाणें भाषेचें सौन्दर्य वाढतें, त्याप्रमाणेंच शब्दांच्या चमत्कृतीनेंही भाषेचें सौन्दर्य वाढतें; हें खालीं दिलेल्या

उदाहरणांवरून ध्यानांत येईल.

१. [ अ ] दे माय, धरणी ठाय ! —( लौकिक )

[ आ ] कर नाहीं, त्याला डर कसली ? ,,

[ इ ] खाकेंत कळसा, गांवभर वळसा. ,,

२. [ क ] " मारतां मारतां मरावें. "

[ ख ] " पोटचें द्यावें, पण पाठचें देऊं नये. "

[ ग ] " मारवाड प्रांतीं दस्तुर हा कीं, समूर घाव घातला, तर उत्तम; नाहींतर पुरुषांचें स्त्रियांनीं मुखावलोकन करूं नये. रजपूत स्त्रियांची हिम्मत या रीतीची तेथें पुरुषांची शिफारस कोठवर लिहावी ?

—( भाऊसाहेबांची बखर )

३. [ च ] प्रभावतीच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत असतां, एकाहून अधिक अर्थांनीं तिचे डोळे " पाणीदार " झाले.

[ छ ] बंडो—त्याला फार मोठें " डोकें " ( मस्तक ) आहे.
गुंडो—मी म्हणतों, त्याला " डोकें " च ( बुद्धि ) नाहीं.

—( प्रो० वा० म० जोशी )

यांत पहिल्या ठिकाणीं शेवटच्या अक्षरांच्या साम्यानें मजा उत्पन्न केली आहे; दुसऱ्या ठिकाणीं मध्यें आलेल्या त्याच त्याच वर्णांच्या योगानें चमत्कार दाखविला आहे; आणि तिसऱ्या ठिकाणीं एकेकाच शब्दाची द्व्यर्थी योजना करून, मनाला मौज वाटेल अशी रचना केली आहे.

मोराच्या डोक्यावरील तुरा व पिसारा हीं त्याला शोभा देतात; आम्रवृक्षाचे डवरलेले पल्लव व विस्तारलेला मोहोर यांनीं त्याला शोभा येते; उघड्या-बोडक्या जळक्या डोंगराला हरित-तृणाच्या योगानें लगेच सौन्दर्य प्राप्त होतें; त्याप्रमाणें भाषेंतल्या वरील प्रकारांनीं व आणखीही कांहीं प्रकारांनीं भाषेचें सौन्दर्य वाढतें; म्हणून भाषेचें सौन्दर्य वाढविणाऱ्या वरीलसारख्या प्रकारांना भाषेचे "**अलङ्कार**" असें म्हटलें आहे.

---

## २१. कांहीं शब्दालंकार

मागील पाठांत **अर्थां**च्या व **शब्दां**च्या दृष्टीनें भाषेला कशी शोभा उत्पन्न होते, तें सामान्यपणें दाखविलें. आतां **शब्दां**च्या चमत्कारांनीं भाषेला कशी शोभा येते, तें थोड्या विस्तारानें पाहूं.

### १. यमक

[**क**] चिमुकल्या छकुल्या न रडें उगा।
धर करीं चिमणी अथवा फुगा ॥
जवळ घेउनियां तुज बैसतें ।
चिमुकल्या कमती वद काय तें? १

येथें पहिल्या दोन चरणांतील व पुढच्या दोन चरणांतील शेवटचें एकएक अक्षर व उपान्त्य स्वर हीं सारखीं आहेत; आणि त्यांमुळेंही एकप्रकारें कानांना कांहीं अंशीं बरें वाटतें; हें आपण पाहतोंच.

| | |
|---|---|
| शब्दभाव बळिलाहि ना**कळे** ।<br>शुक्र सन्निध तयासचि तो **कळे** ॥<br>तो वदे भुज सभे उभा**रुनी** ।<br>त्या बळीप्रतिच हाक मा**रुनी** ॥ | येथें पहिल्या दोन चरणांचीं व पुढल्या दोन चरणांचीं शेवटचीं दोन-दोन अक्षरें सारखीं आहेत. |
| पूजी बळी मग म्हणे बटु वा**मनातें**<br>कीं माग जें तव अभीष्ट गमे **मनातें**<br>देणार गा इतर मी मज **काम नाहीं**<br>तूं माग जे पुरवितों तव **कामनाही** | येथें पहिल्या दोन चरणांतील शेवटचीं तीन-तीन व पुढल्या दोन चरणांतील शेवटचीं चार-चार अक्षरें सारखीं आहेत; असें दिसून येतें. |
| [ख]श्रीपति झाला दशरथ—<br>सुत राम दशाननासि **माराया** ।<br>**मा राया,** जनकाची,<br>होय सुता त्रिजगदाधि सा**राया** | येथें पूर्वार्धाच्या शेवटचीं व उत्तरार्धाच्या आरंभींचीं अक्षरें सारखीं आहेत; अशी रचना आहे. |

याप्रमाणें कवि दुसऱ्याला व आपली आपल्यालाही मजा वाटण्यासाठीं वरच्याप्रकारें एकसारखींच ठराविक अक्षरें ठराविक ठिकाणीं येतील अशी शब्दरचना मुद्दाम जुळवून आणतात; ह्या गोष्टीनें मनाला क्षणभर आनंद होतो, म्हणून येथेंही शब्दांचा जणुं काय अलंकारच जडविला आहे, असें होतें. अशा प्रकारच्या या शब्दांनीं उत्पन्न होणाऱ्या व सामान्यतः शेवटीं येणाऱ्या एक वा अनेक क्रमयुक्त **अक्षरांच्या आल्हादकारक पुनरावृत्तीला " यमक "** अलंकार असें म्हणतात. शब्दालंकाराचा हा एक मुख्य प्रकार होय.

## २. अनुप्रास

**नर**जन्मामधिं **नरा** करुनि घे
**नर-नारा**यण गडी ।
**तरी**च सार्थक मानव-कुडी ॥ १ ॥

येथें '**न**' व '**र**' या दोन **वर्णांची** पुनरावृत्ति आहे.

वंशी नादन**टी** तिला क**टि**त**टीं**
खोवोनि पो**टीं-प**टीं ।
कक्षे वामपु**टीं** स्वश्रृंग निक**टीं**
वेता**टि**ही गोम**टी** ॥
जेवीं नीरत**टीं** तरू-तळव**टीं**
श्रीश्यामदेहीं उ**टी** ।
दा**टी** व्योम-घ**टीं** सुरां सुखलु**टी**
घेती ज**टी** धूर्ज**टी** ॥ २ ॥

येथें '**ट**' ह्या **वर्णाची** चाऱ्ही चरणांत पुनरावृत्ति झालेली दिसत आहे.

वा**जी**चें मन **जा**णता सकळही
रा**जी** शिपाई **ज**या ।
या**जी** होउनियां द्वि**जां**सि म्हणतो
या **जी** धनें घ्यावया ॥
त्या**जी** जो धनदापरी सुकृत **जें**
त्या **जी**व ऐसें गणी ।
गा**जी** तो नळ भूप रूप धरुनी
गा**जी** गुणींच्या गणीं ॥ ३ ॥

येथेंही वरच्या प्रमाणेंच '**ज**' या वर्णाची चारही चरणांत अनेक वेळां पुनरावृत्ति झालेली आढळून येत आहे.

याप्रमाणें कवितेमध्यें एक किंवा अनेक **वर्णां**चीही वारंवार पुनरावृत्ति येते व त्यामुळेंही एक प्रकारें मजा वाटते. अशा प्रकारच्या

म्हणजे मुद्दाम तेच तेच वर्ण पद्यांत अनेकदां येतील अशी शब्दांची **आल्हादजनक** योजना केली असते, त्या शब्दरचनेला "**अनुप्रास**" अलंकार असें नांव आहे.

"**यमक**" व "**अनुप्रास**" यांच्या योगानें अर्थासंबंधीं कांहीं विशेष मजा वाटत नाहीं; परंतु **अक्षरांच्या** किंवा **वर्णांच्या** केवळ सादृश्यामुळें किंवा नादामुळें मजा वाटते. मागील पाठांतील 'जमदग्नि रागीट होते' व 'सीता सुन्दर होती' यासंबंधींच्या उदाहरणांनीं दरेक वेळीं निरनिराळा **अर्थ** उत्पन्न होत असल्यानें आनंद वाटत होता; पण येथील अक्षरें किंवा वर्ण यासंबंधींच्या चमत्कारांच्या वरच्या उदाहरणांत तसा प्रकार नाहीं. म्हणजे **यमक** व **अनुप्रास** यांनीं उत्पन्न होणारा आनंद केवळ बाह्यतः असा आहे, हृदयाशीं भिडून जाणारा नाहीं; हें थोड्या विचारानें आपल्या ध्यानांत येईलच.

---

## प्रश्न व गृहपाठ

१. खालील ठिकाणीं कोणत्या गोष्टी आल्यामुळें कोणते अलंकार साधले आहेत ?

(१) " अही तोही पाही अवसर डसायास **हरिला** ।
परंतु श्रीकृष्णें भ्रमण करितां गर्व **हरिला** " ॥

(२) " शरीरीं फासो**ळ्या**, बहु खुळखु**ळ्या**, होउनि ढि**ल्या** ।
गती तत्प्राणाच्या सकळहि ग**ळ्या**माजि चढ**ल्या** " ॥

(३) " उपरि **सकंटक साचे**, परंतु **साचे** जयांत सुर**साचे** ।
घो**स** अ**से** फण**सांचे**, षण्मा**सांचे** कितेक वर**सांचे** " ॥

( ४ ) " कां रे नाठवीसी । कृपाळू देवासी ॥ पोषितो जगासी । एकलाची " ॥

( ५ ) " आलिया भोगासी, असावें सादर । देवावरी भार, घालूनियां " ॥

( ६ ) " ऊसळे सळसळां जळ डोहीं " ।

( ७ ) " शल्य म्हणे रे सूता, बडबड करितोसि फार मद्यपसा ।
गुरु-सागर बहु गर्जे, परि मुनिचा एकही भरे न पसा " ॥

( ८ ) " आला भूमितळासि गर्वपुतळा पिंजारुनी कुंतळा ।
चापातें उखळावया बळ खळा नाहींच उच्छृंखळा " ॥

( ९ ) " हातें थोपटिल्या भुजा, मज असा नाहीं त्रिलोकीं दुजा ।
मेरूही मजशीं खुजा, सुरवरीं माझीच आधीं पुजा " ॥

२. **यमक** व **अनुप्रास** हे अलंकार कसे ओळखावे ?

---

# २२. प्रमुख अर्थालंकार

एकच विचार **अर्था**च्या दृष्टीनें अनेक प्रकारें गौरवून कसा प्रकट करितां येतो, हें आपण मागें पाहिलें; आतां थोड्या विस्तारानें त्याचा म्हणजे "**अर्थालंकारां**"**चा** विचार करूं.

## १. उपमा

[अ] तूं विजयासि वधाया,
वांछिसि हें कोण जाणता साहे ?
अंबांक-स्थित-शिशु, शशि-
मंडळ कवळावया **जसा** पाहे ।

या ठिकाणीं कर्णाचें अंबांकस्थित शिशूशीं भलतीच इच्छा बाळगणें ह्या दृष्टीनें **साम्य** वर्णिलें आहे.

[आ] सौभद्र म्हणे 'शिरतों,
व्यूहीं डोहीं **जसा** मतंगज वा।
हरिपोत दन्तियूथीं,
कीं दहनीं करुनियां पतंग जवा'

येथें सौभद्राचें मतंगजाशीं, हरिपोताशीं व पतंगाशीं, गतीच्या दृष्टीनें **साम्य** वर्णिलें आहे; त्याचप्रमाणें व्यूहाचें डोहाशीं, दन्तियूथाशीं व अग्नीशीं **साम्य** वर्णिलें आहे.

अशा रीतीनें एका वस्तूचें दुसऱ्या वस्तूशीं एक किंवा अनेक प्रकारें रम्य **साम्य** दाखविलें जातें, तेव्हां "**उपमा**" हा अलंकार होतो. (यांतील रचनेंत **जसा, ज्याप्रमाणें, जेंवि,** हे शब्द आवश्यक असतात.)

## २. रूपक

[अ] पार्थ-पयोधर गर्जे,
स्पर्धा मंडूक तूं वृथा करिशी।
त्याच्यापुढें टुरुटुरू,
टरों टरों शब्द हे किती करिशी?

या ठिकाणीं पार्थाला पयोधर व कर्णाला मंडूक असें म्हणून त्या दोघादोघांचा **अभेद** म्हणजेच ऐक्य वर्णिलें आहे.

[आ] "सरला सुकृताचा तंतू।
आयुष्य-तैला झाला अन्तू॥
माझिये हस्तीं व्यजन-वातू।
भीमरूपें उदेला"॥

येथेंही मनुष्याचा प्राण व दिवा, सुकृत व दिव्याची वात, आयुष्य व तेल आणि भीम व व्यजनवात यांचा **अभेद** म्हणजेच ऐक्य वर्णिलें आहे.

याप्रमाणें एक वस्तु दुसऱ्या वस्तूसारखीच आहे, असें नाहीं; तर त्या **अभिन्न** म्हणजे **एकरूपच** आहेत, असें रमणीय रीतीनें

दाखविलें जातें; तेव्हां "**रूपक**" हा अलंकार होतो. ( यांत उपमेंतल्याप्रमाणें जसा, ज्याप्रमाणें, हे शब्द रचनेंत येत नाहींत. )

## ३. उत्प्रेक्षा

[अ] ही आम्रपंक्ति पवनें बहु डोलताहे ।
शाखाग्रपल्लवकरें कुसुमांस वाहे ॥
**जाणो** स्वपोषक वसंत गृहास आला
तत्पूजनार्थ बहु हर्षचि हीस झाला ॥

वसंत घरीं आला म्हणून कांहीं आम्रपंक्ति डोलत नसते, ती साहजिकच हालत असते; परंतु येथें कवीनें, वसंत घरीं आला म्हणून त्याच्या पूजनाकरितां ती डोलत आहे व कुसुमांस वहात आहे, अशी कल्पना केली आहे व ती **जाणो** या शब्दांनीं दर्शविली आहे.

[आ] वर्षाऋतूंत तुजला प्रतिवर्ष माते,
ये तो न पूर तव जो भिजवी तटातें
पान्हा फुटूनचि **जणो** हरुषें पयातें
तूं देवि पाजिसि तया निजनंदनातें

येथें गंगेला साहजिकपणें जो पूर येतो त्यावर कवीनें, ती गंगा आपल्या मुलांना ( तिला पान्हा फुटून ) दूध पाजिते; अशी कल्पना केली आहे; व ती **जणो** या शब्दानें व्यक्त केली आहे.

याप्रमाणें एकादी गोष्ट मूळची तशी नसतां, ती निराळ्याच प्रकारची आहे कीं काय, अशा आशयाची काव्यात्मक सुन्दर कल्पना जेव्हां व्यक्त झालेली असते, तेव्हां "**उत्प्रेक्षा**" हा अलंकार होतो. ( या रचनेंत '**जणु, जाणो, जणुं कांहीं,**' हे शब्द आवश्यक असतात. )

## ४. अपह्नुति

[अ] सखिहस्तीं हस्त **न** नृप,
पांडव-हृदयांत सायका मारी ।

येथें दुर्योधनानें कर्णाच्या हातावर हात मारिला नाहीं, तर तो पांडवांच्या हृदयांत बाण मारिला आहे, असा त्यावर **आरोप** केला आहे.

[आ] **न** हें नभोमंडल, वारिराशी ।
**न** तारका, फेसचि हा तयाशीं ॥
**न** चंद्र हा, नावचि चालताहे ।
**न** अंक तो तीवर शीड आहे ॥

येथेंही नभोमंडलावर वारिराशीचा, तारकांवर फेसाचा, चंद्रावर नावेचा व त्याचेवरील अंकावर शिडाचा, याप्रमाणें—मूळ गोष्टी जशा आहेत त्या तशा नाहींत; असें म्हणून — **आरोपच** केलेला आहे.

अशा रीतीनें खरी गोष्ट लपवून ती दुसऱ्याच प्रकारची आहे असें प्रतिपादिलें असतें; किंवा तसा काव्यात्मक **आरोपच** तीवर केला असतो, तेथें "**अपह्नुति**" हा अलंकार होतो. (यांत मूळची गोष्ट खरी असतां, ती तशी नाहीं; असें प्रतिपादिलें असतें. निषेधार्थक '**न**' कार यांत अवश्य असावा लागतो. 'अपह्नव' या शब्दाचा अर्थ लपविणें हा आहे.)

## ५. दृष्टान्त

[अ] काव्य करावें नच म्यां,
वचकावें दूषितो परि लघूस ।
कां न सदन बांधावें ?
कीं त्यांत पुढें बिळें करिल घूस

येथें आपण क्षुद्रांना भिऊन काव्य कां करूं नये, (करावें); ही गोष्ट सांगण्यासाठीं, घुशींना भिऊन घर बांधणें कांहीं कोणी सोडीत नाहीं; ही दुसरी गोष्ट **उदाहरणा**दाखल सांगितली आहे.

[आ] शश-मंडळांत कोल्हा,
म्हणतो 'मी सिंह' वल्गना करितो
जोंवरि न पाहिला गज—
मुक्ताफळकवळभक्षिता हरि तो॥

यांत अर्जुनापुढें कर्णाचें कांहीं चालणार नाहीं, ही गोष्ट सांगावयाची असतां, कोल्ह्याचें सिंहापुढें कांहीं चालूं शकत नाहीं; या **उदाहरणा**नें ती अधिक स्पष्ट केली आहे.

याप्रमाणें एकाद्या गोष्टीच्या स्पष्टीकरणार्थ दुसऱ्या गोष्टीचें उदाहरण किंवा दाखला देऊन, ती सुन्दर रीतीनें स्पष्ट केली असते; तेव्हां "**दृष्टान्त**" हा अलंकार होतो. ( यांत साम्यसूचक जसें, ज्याप्रमाणें इ० शब्द येत नाहींत. )

## ६. अर्थान्तरन्यास

[अ] निर्बलहि एकवटतां,
साधे दुष्करहि कार्यभाग जरी।
दोरी करुन तृणाची,
त्यायोगें बांधितात मत्त करी॥

'निर्बल देखील एकवटले असतां दुष्कर कार्यही साधितात' हा सामान्य सिद्धान्त, येथें तृणाची दोरी करून मत्त हत्तीही बांधतां येतो; ह्या विशेष उदाहरणावरून दर्शविला आहे.

[आ] तदितर खग भेणें वेगळाले पळाले
उपवनजलकेली जे कराया मिळाले
स्वजन गवसला जो त्याजपाशीं नसे तो
कठिण समय येतां कोण कामास येतो

येथें 'हंसाच्या कोणी उपयोगी पडलें नाहीं' या विशेष गोष्टीवरून 'कठिण समय येतां कोण कामास येतो?' हा सामान्य सिद्धान्त काढिला आहे.

याप्रमाणें जेव्हां विशेष गोष्टीवरून सामान्य सिद्धान्त सांगितला जातो, किंवा सामान्य सिद्धान्ताला परिपोषक असें विशेष उदाहरण दिलें जातें, तेव्हां हा "**अर्थान्तरन्यास**" नांवाचा अलंकार होतो.

## ७. अन्योक्ति

[अ] मर्कटांस कोणीं, मोतियांचा सर ।
अति मनोहर, अर्पियला ॥ १.
तें न खाद्य ऐसें, मर्कटें पाहून ।
दिला तो फेकून, दूरवरी ॥ २.

येथें माकडाच्या गोष्टीवरून 'अरसिकापुढें चांगल्या गोष्टी व्यर्थ होत' ही प्रतिपाद्य गोष्ट आडपडद्यानें सुचविली आहे.

[आ] फळें मधुर खावया
असति नित्य मेवे तसे ।
हिरेजडित सुंदरीं
कनकपंजरींही वसे ॥
अहर्निश तथापि तो
शुक मनांत दुःखें झुरे ।
स्वतंत्र वनवृत्तिच्या
घडिघडी सुखातें स्मरे ॥

येथें शुकाबद्दल बाह्यतः विवेचन असून, वस्तुतः तें अन्यालाच म्हणजे परतंत्र मनुष्याला लागू पडणारें आहे. येथें परतंत्र मनुष्याची अवस्था प्रतिपाद्य किंवा प्रस्तुत आहे.

याप्रमाणें मनांत ज्याविषयीं बोलावयाचें असतें, त्याविषयीं साक्षात् न बोलतां, अन्याविषयीं बोलून, तद्द्वारें तें प्रकट केलें जातें, तेथें "**अन्योक्ति**" अलंकार होतो. (यालाच कोणी "अप्रस्तुत-प्रशंसा" असेंही म्हणतात; प्रशंसा म्ह० कथन.)

## ८. श्लेष

[अ] रक्षावा धर्म असा,
करिसी उपदेश तरि असे मान्य ।
रक्षितसों **धर्मातें**,
आम्हांला धर्म ठाउका नान्य ॥

येथें **धर्म** ह्या शब्दाची दोन अर्थांनीं योजना केली असून, ती त्यांपैकीं कोणत्याही अर्थानें तेथें लागू पडेल, अशी आहे.

[आ] ते शीतलोपचारीं,
जागी झाली हळूच मग बोले ।
औषध **नलगे** मजला,
परिसुनि जननी, बरें म्हणुनि डोले

येथें **'नलगे'** ह्या शब्दाचे 'नलगे' म्ह० 'नको' व 'नल गे' म्हणजे 'गे आई, नल', असे दोन अर्थ आहेत; व ते दोन्ही या ठिकाणीं लागू पडतील अशाप्रकारें मुद्दामच त्या शब्दाची योजना केलेली आहे.

याप्रमाणें जेथें मुद्दामच शब्दाची द्व्यर्थी योजना एका वाक्यांत साधलेली असते, तेथें "**श्लेष**" हा अलंकार होतो.

यांशिवाय "तुम्ही मोठे शहाणे आहांत" म्हणजे '**मूर्ख आहांत**' असा अगदीं उलट अर्थ केंव्हां केंव्हां हावभाव, स्वर, इ०नीं व्यक्त केला जातो; त्याचप्रमाणें—"जो अंबरीं उफळतां खुर लागलाहे, तो चंद्रमा निजतनूवरि डाग लाहे" हें नळाच्या घोड्याच्या वेगाचें वर्णन खरेंखुरें सत्य नसून, त्यायोगें केवळ अतिशयपणा दर्शवावयाचा आहे, एवढाच तेथें हेतु आहे; तसेंच—"हें पहा इंग्लंड माझ्या हातांत आलें आहे, आतां तें मी सोडीन काय ?" (नाहीं); हें निश्चित उत्तरच या वाक्यांत जरी प्रश्न केलेला आहे, तरी आपोआप

स्पष्ट होत आहे. असे प्रकार गद्यांत व पद्यांत पुष्कळच वेळां येतात. त्यांस अनुक्रमें "**व्याजोक्ति**", "**अतिशयोक्ति**" व "**प्रश्न**" अलंकार अशीं नांवें देतां येतील. अशा प्रकारें अनेक अर्थ सुचविणारे अनेक अलंकार व त्यांमधील पोटभेद गद्यांत किंवा पद्यांत आढळूं शकतील; परंतु तितक्या खोलांत येथें जाण्याचें कारण नाहीं. अर्थाच्या पुसट पुसट अशा थोड्याशा फरकानेंदेखील निरनिराळे अलंकार उत्पन्न होऊं शकतात; एवढें आपल्यास वरील उदाहरणांवरूनही कळण्यास कांहीं अडचण पडेल, असें वाटत नाहीं. वरील मुख्य अलंकार मात्र आपल्यास नीट कळावयास हवेत.

---

## प्रश्न व गृहपाठ

१. खालील पद्यांतील अलंकार ओळखा—

(१) [ साधु कसा असतो तर ] जो सर्वां भूतांचे ठायीं । द्वेषातें नेणेंचि कांहीं ॥ आपपर जया नाहीं । चैतन्या **जैसें** ॥

(२) वोखटें का गोमटें । हें कांहींच जया नुमटे ॥ रात्रदिवस न घटे । सूर्या **जेंवि** ॥

(३) घरींचिया उजेड करावा । पराविया अंधार पाडावा ॥ हा भेद नाहींच ठावा । दीपा **जैसा** ॥ —( ज्ञानेश्वरी )

(४) " नद्या ओढे नाले मिळति समभावें जलधिला ।
असाधू वा साधू शरण रिघतां पावति तुला " ॥—( मोरोपंत )

(५) "भवाब्धिपतिता मला प्रभु तुझी **कृपा-नाव** दे" ॥—( महाजनि )

(६) "वर्षाऋतूंत तुजला प्रतिवर्ष माते, ।
ये तो न पूर तव जो भिजवी तटातें ॥

पान्हा फुटूनचि **जणों** हरुषें पयातें ।
तूं देवि पाजिसि तया निज-नंदनातें " ॥ –( चिं० पेठकर )

( ७ ) " **भासे** मला विमल भारतभूमिका हे ।
त्वत्स्रोत हेंचि शुभमंगलसूत्र वाहे ॥
तीरीं पुरें विलसती घन लागलेलीं ।
मुक्ताफळेंचि **जणुं** त्यांतुनि ओवियेलीं " ॥ –( चिं० पेठकर )

( ८ ) " कुतीचीं आयाळें जडवुनि गळा पुष्ट करुनी ।
वसे श्वा सिंहाच्या पदिं बहुत आवेश धरुनी ॥
तरी जो ऐकोनी भिउनि पळती मत्तहि करी ।
कसा त्या नादातें क्षणभरिहि तो पामर करी ? " ॥–(कृ०चिप०)

( ९ ) " मी असतां कां माझ्या तातें केश-ग्रहास पावावें ? ।
मग कैसें बापांनीं पुत्रांपासूनि भव्य इच्छावें ?" ॥– (पर०तात्या०)

( १० ) " ऐसा जल्पुनि चाप जाड उचलों जातां न हाले कदा ।
**जैसा** शैल मतंगजासि न ढळे, पाहे विदेहात्मजा " ॥

( ११ ) " **जैसा** सिंह उफाळला हिमगिरीच्या गव्हरापासुनि...।
...तैसा राम उठावला धनुवरी; लक्षी मृगाक्षी उभी " ॥

( १२ ) " मध्यें भंगे, कडाडी; प्रतिनदन नभीं मेघ जैसा गडाडी " ॥
–( आनंदतनय )

( १२ ) " अतिनीच पापकर्मा हीनकुलोत्पन्न सूतज सहाय ।
शशिवंशभूषणाला तुज गुणवंतास योग्य हा काय ? " ॥
–( पर० तात्या० )

( १४ ) " दशरथ मृत झाला, राम जातां वियोगें ।
तृण बहुत दिसांचें अग्निच्या **जेंवि** योगें " ॥

( १५ ) " न माय तूं वैरिण होसि साची । माझे मनीं भाव असे असाची " ॥

( १६ ) " मानवी तनु पशूंत गणावी । ते शिळा परि सजीव म्हणावी " ॥

( १७ ) " मी ब्रह्महत्याशतपाप लाहें । ठावें असे लेश जरी मला हें ॥
खड्गें वसिष्ठासि अरुंधतीतें । वधीं जरी ठाउक हें मतीतें " ॥
–( वामन )

( १८ ) " रक्षावा धर्म असा करिसी उपदेश तरि असे मान्य ।
रक्षितसों **धर्मातें** आम्हांला धर्म ठाउका नान्य " ॥

( १९ ) " श्रीमंत्ररामायण-रत्नमाला । समर्पिली श्रीरघुसत्तमाला " ॥

( २० ) " वाल्मीकिविप्रोत्तम-काव्यपद्म । श्रीरामलीला-मकरंदसद्म ।
तेथें मयूरेश्वर भृंग झाला । सेवावया नित्य सुखें रसाला " ॥

( २१ ) " खळ निंदिति म्हणुनि बुधें टाकावी काय हरिगुणासक्ती ? ।
दीर-नणंदा-जाचें साध्वी न त्यागिती सुपति-भक्ती " ॥

( २२ ) " अलंकारेंयुक्ता रघुपतिकथा शोभत असे ।
अलंकारेंहीना जरि म्हणति कोणी न विलसे ॥
कृताभ्यंगस्नाना कनकमणिभूषाविरहिता ।
विराजे सिन्दूरें धवल-वसनें भूप-वनिता " ॥

( २३ ) " गीर्वाणें राघवाचें यश रसिकजनां लागतें फार मिष्ट ।
तैसें न प्राकृतानें अचतुर म्हणती मानिती तें न शिष्ट " ॥

( २४ ) " **जसे** होती देव प्रमुदित शचीनायकवनीं ।
तसे सारज्ञाते बुधजन मयूरेशकवनीं " ॥ —( मोरोपंत )

( २५ ) " गंगेच्यापरिस जरीहि जाह्नवीचें ।
आकारें द्विगुणित पात्र होय तीचें ॥
तत्रापि प्रथिततरा तिहींहि लोकीं ।
त्या दोघींतुनि पहिलीच राहते कीं—
—आकारावरुनि न या जनीं प्रभावें ।
विख्याती सकळहि लोक मूळ पावे " ॥ —( चिं० पेठकर )

( २६ ) " रत्नांनीं पूर्ण गेले विपणि तळ **जणों** अब्धिचे ते लयाला ! " ॥
—( वा० वा० खरे )

( २७ ) " नसेन दिसलों कसा नयन सर्वसाक्षी रवी ।
विषाद धरिला म्हणों, न सुरभी विषक्षीर वी ! " ॥

( २८ ) " प्रसाद करितां नसे पळ विलंब बापा खरें ।
घनांबु न पडे मुखीं उघडिल्याविना पांखरें " ॥ —( मोरोपंत )

(२९) " तुझें यशचि तारितें परि न केवळा तारवे ।
सहाय असिला असे, तरिच शत्रुला मारवे" ॥ –(मोरोपंत)

(३०) " जो अंबरीं उफळतां खुर लागलाहे ।
तो चंद्रमा निजतनूवरि डाग लाहे " ॥ –(रघु० पंडित)

२. खालील अलंकार ओळखा—

[१] टिपू वाघाप्रमाणें आहे.

[२] टिपू वाघ आहे.

[३] टिपू जणुं कांहीं वाघ आहे.

[४] तो टिपू नव्हे, वाघ आहे.

## मॅक्मिलन्चीं शाळोपयोगी पुस्तकें

मॅक्मिलन्चे मराठी किल्ले, नं. १ ते ५ प्रत्येकी कि. रु. ०-१-६

महाराष्ट्राच्या इतिहासांतील सोप्या गोष्टी, गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए., कृत; कि. रु. ०-६-०

हिंदुस्थानचा इतिहास, ई. मार्सडेन्, बी. ए., कृत; कि. रु. १-४-०

हिंदुस्थानच्या इतिहासांतील सोप्या गोष्टी, सचित्र, ई. मार्सडेन्, बी. ए., कृत; कि. रु. ०-१२-०

इतिहासाचे प्राथमिक पाठ, सचित्र, ई. मार्सडेन्, बी. ए., कृत; कि. रु. ०-१४-०

ब्रिटिश साम्राज्याचा संक्षिप्त इतिहास, जी. ॲन्डरसन्, व ई. मार्सडेन्, बी. ए., कृत; कि. रु. १-०-०

भूगोलविद्येचे प्राथमिक पाठ, ई. मार्सडेन्, बी. ए., कृत; कि. रु. १-२-०

भूगोलवर्णन, ई. मार्सडेन, बी. ए., कृत; कि. रु. १-१२-०

संस्कृत-अभिनवा पाठावलिः, प्रथमा--प्रो. विनायक पांडुरंग बोकील, एम्. ए., एस्. टी. सी. डी., कृत; कि. ८ आणे.

संस्कृत-अभिनवा पाठावलिः, द्वितीया--प्रो. विनायक पांडुरंग बोकील, एम्. ए., एस्. टी. सी. डी., कृत; कि. १२ आणे.

प्राथमिक शिक्षणाच्या मराठी शाळांतील शिक्षकांचें हस्तपुस्तक, जे. ए. रिची, एम्. ए., कृत; कि. रु. १-८-०

वाग्विहार, भाग १, प्रो. गणेश हरि केळकर, एम्. ए., कृत; कि. रु. १-०-०

वाग्विहार, भाग २, प्रो. वासुदेव बळवंत पटवर्धन, बी. ए., कृत; कि. रु. १-४-०

जगाचें वाङ्मय, रा. प. सवनीस, एम्. ए. (केंब्रिज), एफ्. आर्. ई. एस्., कृत; कि. रु. १-४-०

रसतरंगिणी, प्राचीन व अर्वाचीन कवितांतील निवडक वेंचे, सीताराम वासुदेव पेंडसे, बी. ए., एम्. पी. सी., कृत; कि. रु. २-८-०

आरोग्यविज्ञान, रामचंद्र महादेव जोशी, एम्. ए., एलएल्. बी., बी. एस्सी. (लंडन), आय्. ई. एस., कृत; कि. रु. ०-६-०

आरोग्यविद्येचीं मूलतत्त्वें, मुलींकरितां, मेजर हचिसन, आय्. एम्. एस., कृत; कि. रु. ०-१२-०

संस्कृत गद्यावली, पांडुरंग वामन काणे, कृत; कि. रु. १-८-०

संस्कृत पद्यावली, पांडुरंग वामन काणे, कृत; कि. रु. १-०-०

संस्कृत-शिक्षिका, रा. ब. कमलाशंकर प्राणशंकर त्रिवेदी, बी. ए., कृत; कि. रु. २-०-०

---

Macmillan's Series of New Marathi Grammars, Book IV.
By M. S. Mone, Price 6 Annas. 1930